- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

▸ संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : रविवार, ९ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २४१ | किंमत : २ रूपये

**सोने-चांदी**

- २४ कॅरेट : १,४८,७०० /-
- २३ कॅरेट : १,४६,३५० /-
- चांदी : २,३८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# तुकाराम मुंढे आता दारु आणि बिअरमधील भेसळ रोखणार !

## लोकांना दर्जेदार अन्न आणि मद्य मिळावं यासाठी आम्ही कारवाई करणार: मुंढे

**वृत्तसंस्था, पुणे**

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी अन्नात होणाऱ्या भेसळींविरोधात कारवायांचा सपाटाच सुरू ठेवला आहे. मात्र, सेवन हे फक्त अन्नातच होत नाही तर दारू आणि बियरमध्ये सुद्धा होते, अशातच तुकाराम मुंढे याही गोष्टींकडे लक्ष देणार का असा सवाल त्यांना विचारला असता. सध्या कामाचा लोड जास्त आहे, मात्र दारू मधील होणाऱ्या भेसळी संदर्भात लवकरच कारवाया सुरू करणार आहे, असा शब्द तुकाराम मुंढे यांनी दिला आहे. त्यामुळे दारू आणि बिअरमध्ये भेसळ करणाऱ्या मोठ मोठ्या ब्रॅण्डचे धाबे दणाणले आहेत.

तुकाराम मुंढेंनी मुलाखतीत एक घटनाप्रसंग सांगितला. ते म्हणाले, माझ्याकडे एफडीएचा एक अधिकारी आला आणि त्यांने म्हटले की साहेब मला रात्रीची ड्युटी नको, त्यावर मुंढे म्हणाले की रात्री कामाचा लोड कमी असतो. त्यावर त्या अधिकाऱ्याने सांगितलं की, रात्री १२-१ वाजता दारू पिऊन लोकं फोन करून तुकाराम मुंढे साहेबांचा नंबर द्या आम्हाला त्यांच्याशी बोलायचं आहे असं म्हणतात.

आम्ही जेव्हा सांगतो की तुमची तक्रार द्या. तेव्हा ते सांगतात की मी सध्या बारमध्ये ड्रींक्स घेतोय आणि दारूची टेस्ट काय बरोबर नाही. आम्हाला मुंढे साहेबांकडे त्याची तक्रार करायची आहे नाहीतर तुम्ही इथे तुमची एफडीएची टीम पाठवा, अशी मागणी करतात, असा किस्सा त्यांनी सांगितला.

मी कधी दारू पिली नाही मात्र दारूमध्ये होणारी भेसळ हा खूप महत्वाचा मुद्दा आहे. काही दिवसांपूर्वी पुण्यात गावठी दारू पिऊन २० जणांचा मृत्यु झाला. कंपनी मधील काही केमीकल परवानगी नसताना या अनधिकृत दारू भट्टी चालकांपर्यंत पोहचतात त्यावर नियंत्रण आम्ही आणतोय, तश्या काही कारवाई सुध्दा आम्ही केल्या आहेत.

दारू म्हणल्यानंतर आपल्यासमोर येतो ते राज्य उत्पादन शुल्क विभाग मात्र त्यांचा रोल टॅक्स आणि लायसंसचा आहे, माझा रोल हा क्वालीटी, वापरण्यात येणारे साहित्य आणि ब्रॅण्डिंग आणि मार्क्रेटिंगचा आहे. आम्ही दूध,पनीर, तेल यांच्या दर्जाबद्दल जश्या कारवाया केल्या तश्याच दारूबद्दल सुध्दा पुढच्या काळात करणार आहोत. अल्कोहॉलिक आणि नॉन अल्कोहॉलिक यावर सुध्दा आम्हाला कारवाया करायच्या आहेत. लोकांना दर्जेदार अन्न आणि मद्य मिळावं यासाठी आम्ही कारवाई करणार आहोत, असेही त्यांनी सांगितले.



**थोडक्यात**

## गाई-म्हशीचे दूध महागले! ११ ऑगस्टपासून नवे दर

**मुंबई** : महागाईच्या झळा सहन करणाऱ्या सर्वसामान्यांच्या खिशाला आता पुन्हा एकदा कात्री लागणार आहे. डिझेल, साखर आणि पॅकिंग साहित्याच्या दरात झालेल्या प्रचंड वाढीमुळे दूध उत्पादक आणि प्रक्रिया व्यावसायिकांनी दूध विक्रीच्या दरात प्रतिलिटर २ रुपयांची वाढ करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. हे नवे सुधारित दर येत्या मंगळवार, ११ ऑगस्टपासून लागू होणार असून केवळ दूधच नव्हे, तर दही, ताक, पनीर, तूप यांसारख्या विविध दुग्धजन्य पदार्थांच्या किमतीतही तब्बल १० टक्क्यांपर्यंत वाढ होणार आहे. राज्यातील सहकारी आणि खासगी डेअऱ्यांची शिखर संस्था असलेल्या दूध उत्पादक व प्रक्रिया व्यावसायिक कल्याणकारी संघाची एक महत्त्वपूर्ण बैठक पुण्यात पार पडली. संघाचे अध्यक्ष गोपाळराव म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली कात्रज डेअरी येथे झालेल्या या बैठकीत सुमारे २० प्रमुख दूध संघांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या वेळी दूध संकलन, प्रक्रिया, पॅकिंग आणि वाहतुकीवर होणाऱ्या वाढत्या खर्चाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. डिझेलच्या दरात लिटरमागे १० रुपये, साखरेच्या दरात किलोमागे १२ रुपये आणि पॅकिंग साहित्यात ३० टक्क्यांहून अधिक वाढ झाल्याने दूध व्यावसायिकांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. हा वाढता उत्पादन खर्च भागवण्यासाठी आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा यासाठी ही दरवाढ अनिवार्य असल्याचे संघाने स्पष्ट केले.

# भूकंपाच्या धक्क्यांनी हादरले नाशिक

## नाशिक शहर आणि विविध तालुक्यांमध्ये जाणवले धक्के, भूकंपाची तीव्रता ४.३ रिश्टर स्केल

**वृत्तसंस्था, नाशिक**

नाशिक शहर आणि जिल्ह्यात अनेक भागात भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. या भूकंपाचे केंद्र नाशिक शहरापासून ५३ किलोमीटर अंतरावर असल्याचं समोर आलं आहे. भूकंपाची तीव्रता ४.३ रिश्टर स्केल असल्याची माहिती समोर आली आहे. ग्रामीण भागात केंद्रबिंदू असणाऱ्या या भूकंपाचे हादरे नाशिक शहरात ही जाणवले आहेत.

नाशिक जिल्ह्याती सुरगाणा, दिंडोरी, सप्तश्रृंगी गड, पेठ या ग्रामीण भाग सोबतच नाशिक शहारत अनेक भागात धक्के जाणवल्याची माहिती स्थानिकांकडून देण्यात आली आहे. पेठ, दिंडोरी, कळवण, चांदवड, देवळा, नाशिक या तालुक्यात भूकंपाचे धक्के जाणवले.




**नाशिकच्या ग्रामीण भागात भूकंपाचे धक्के सुरुच**

नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागासह नाशिक शहरातील अनेक भागांमध्ये भूकंपांचे धक्के जाणवले आहे, यामुळं नाशिककरांमध्ये घबराट दिसून आली आहे. गेल्या आठवड्याभरापासून नाशिकच्या ग्रामीण भागांमध्ये भूकंपाचे धक्के जाणवत आहेत. नाशिक जिल्ह्यात व तालुक्यात भूकंपाचे धक्के जाणवल्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना जिल्हा प्रशासनाकडून सर्व नागरिकांनी सतर्क राहावे आणि सुरक्षिततेची काळजी घ्यावी, असं आवाहन करण्यात आलं आहे.

**नाशिक जिल्हा प्रशासनाकडून महत्त्वाच्या सूचना**

नागरिकांनी भूकंपाचे धक्के जाणवत असताना घरात असल्यास खिडक्या, काचा, कपाटे व जड वस्तूंपासून दूर राहावे. शक्य असल्यास मजबूत टेबलाखाली आसरा घ्यावा. भूकंपाचे धक्के सुरू असताना लिफ्टचा वापर करू नये व धावत बाहेर पडण्याचा प्रयत्न करू नये.धक्के थांबल्यानंतर इमारतीपासून सुरक्षित अंतरावर मोकळ्या जागेत जावे. विजेच्या तारा, झाडे व धोकादायक बांधकामांपासून दूर राहावे. अफवा किंवा अप्रमाणित माहिती पसरवू नये. प्रशासनाकडून मिळणाऱ्या अधिकृत सूचनांचे पालन करावे, असं आवाहन नाशिक जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आलं आहे.

भूकंपाचे धक्के जाणवत असताना नागरिकांनी विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींची काळजी घ्यावी. नागरिकांनी सतर्क राहावे, सुरक्षित राहावे आणि अफवांवर विश्वास ठेवू नये असं आवाहन करण्यात आलं आहे. सर्व नागरिकांनी शांतता राखून एकमेकांना सहकार्य करावे, असं जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आलं आहे.

# हिमाचल प्रदेशमध्ये भीषण अपघात, ८ ठार

**चंबा** : हिमाचल प्रदेशमधील चंबा जिल्ह्यात बैरागढ-चंबा मार्गावर आज सकाळी ८ ऑगस्ट रोजी भीषण अपघात झाला. एक खासगी बस बैरागढहून चंबाकडे जात असताना, देविकोठीजवळील चालुज वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने रस्त्यावरून खाली कोसळली आणि थेट १०० फूट खाली असलेल्या दुसऱ्या रस्त्यावर जाऊन पडली. प्राथमिक माहितीनुसार, या भीषण अपघातात बसचालक आणि वाहकासह एकूण आठ जणांचा मृत्यू झाला आहे.



तसेच, जखमींपैकी सुमारे सात प्रवाशांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. शर्मा ट्रॅव्हल्सची बस सकाळी साडेसहाच्या सुमारास बैरागढहून चंबाकडे निघाली होती. अवघे तीन किलोमीटरचे अंतर कापल्यानंतर, चालुज वळणाजवळ चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस खाली कोसळली. अपघाताच्या वेळी बसमध्ये सुमारे २० ते २५ प्रवासी होते. घटनेची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मदत व बचावकार्य सुरू केले. ग्रामस्थांनी अथक प्रयत्नांनंतर अपघातग्रस्त बसमधून जखमींना बाहेर काढले आणि उपचारासाठी तिस्सा येथील रूग्णालयात दाखल केले.

## १३ ऑगस्टपासून पावसाचा जोर पुन्हा वाढणार

**मुंबई** : गेल्या काही दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतली होती. मात्र, आता हवामानात पुन्हा बदल होण्याचे संकेत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढू शकतो. १३ ते २० ऑगस्ट या काळात विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि कोकणात सरासरीपेक्षा जास्त पाऊस होण्याची शक्यता आहे. तसेच २० ते २७ ऑगस्ट दरम्यान राज्यातील विविध भागांमध्ये पाऊस सुरूच राहण्याची शक्यता आहे, असे ज्येष्ठ हवामानशास्त्रज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांनी सांगितले आहे. हवामान विभागाने हवामानासंबंधित एक महत्त्वपूर्ण अंदाज जाहीर केला आहे. येत्या २४ तासांत बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याचा इशारा दिला आहे. तसेच चालू महिन्यात महाराष्ट्रात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# कुणबी दाखले अपात्र ठरवणे ही मराठा समाजाची फसवणूक, शशिकांत शिंदे यांची टीका

**वृत्तसंस्था, कोल्हापूर**

सत्तेतील मंडळींनी राजकारणासाठी मराठा-ओबीसींमध्ये वाद निर्माण केला. एका बाजूला कुणबी दाखले दिले आणि परत अपात्र ठरवले जात आहेत, ही मराठा समाजाची फसवणूक आहे. मराठा नेते आता महायुतीतील नेत्यांवर टीका करत आहेत. या नेत्यांनी जे पेरलं तेच आता उगवू लागले आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी शनिवारी येथे पत्रकारांशी बोलताना केली.

ते म्हणाले, एखाद्या महिला-भगिनींच्या संदर्भात असे बोलणे योग्य नाही, एखाद्यावर अचानक जबाबदारी पडली तर त्याला तयार व्हायला वेळ लागतो. काँग्रेसने काय बोलले याच्यावर आपण बोलणे योग्य नाही. विरोधक असलो तरी आपल्या बोलण्यात सुसंस्कृतपणा असावा. केंद्र सरकार आता युवकांशी संवाद साधत आहे, जंतर-मंतरवरील आंदोलनानंतर हा संवाद सुरू झाला आहे; पण देशातील तरुणांमध्ये केंद्र सरकारच्या विरोधात असंतोष आहे.



महायुतीत सगळे आलबेल आहे असे नाही. त्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटत असावेत. महायुतीतील पक्षांची एकमेकांमध्ये स्पर्धा निर्माण झालेली आहे. कदाचित, यातून ते नाराज असतील म्हणून भेटून दरेगावला गेले असावेत, असे शशिकांत शिंदे यांनी सांगितले.

# फडणवीस, शिंदेंना कितीही वळवळ करु द्या, त्यांचा माज मोडल्याशिवाय गप्प बसणार नाही : मनोज जरांगे

**वृत्तसंस्था, सोलापूर**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचा पश्चिम महाराष्ट्राचा दौरा सुरु आहे. या दौऱ्यावेळी सोलापूरच्या वैरागमध्ये मनोज जरांगे यांनी मराठा बांधवांना संबोधित केलं आहे. तुमची लेकरं बाळं संकटात आहेत, आता मराठा समाज संकटात सापडला आहे.शिरसाटने सुद्धा आणि बावनकुळेंनी सुद्धा प्रमाणपत्र रद्द करायला लावली आहेत. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांना कितीही वळवळ करु द्या, त्यांचा माज मोडल्याशिवाय गप्प बसणार नाही, असा हल्लाबोल मनोज जरांगे पाटील यांनी केला.



देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांना कितीही वळवळ करू द्या त्यांचा माज मोडल्याशिवाय गप्प बसणार नाही असा हल्लाबोल मराठा आंदोलन मनोज जरांगे पाटील यांनी सोलापुरातल्या वैराग गावात बोलताना केला. तुम्ही चुकीचं पाऊल उचललं आहे. मी एकनाथ शिंदे साहेबांना प्रचंड मानणारा माणूस आहे. त्या माणसानं मराठ्यांच्या नोंदी शोधल्या, समिती गठित केली, आणि ५८ लाख नोंदी शोधाव्या लागल्या. यामध्ये उदय सामंत आणि शंभूराज देसाई यांना मरमर करावी लागली. ज्या शिंदे साहेबांनी मराठ्यांना ५८ लाख नोंदी दिल्या, त्याच्यांच शिरसाट या मंत्र्यानं शिंदे साहेबाच्या आदेशानं नोंदी रद्द करायचा घाट घातला, असा आरोप मनोज जरांगे यांनी केला. आपण मुंबईला गेलो होतो, त्यानंतर मी देवेंद्र फडणवीस यांना एका शब्दानंही दुखावलं नाही. त्याच फडणवीस यांच्या सांगण्यावरुन बावनकुळे यांनी मराठ्यांची कुणबी प्रमाणपत्र रद्द करायला सुरुवात केली. मी काय चुकीचं बोलतोय, असा सवाल मनोज जरांगे यांनी केला आहे.

दरम्यान, मराठवाड्यात ४ कुणबी प्रमाणपत्र रद्द झाल्यानंतर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे आता चांगलेच संतापले असल्याच दिसून येत आहे.पश्चिम महाराष्ट्राचा दौरा सुरू केल्यानंतर सातत्याने जरांगे पाटील देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यासह सरकारमधील मंत्र्यांवर टीका करत हल्लाबोल करत आहेत.

**मनोज जरांगे चंद्रशेखर बावनकुळेंविरोधात आक्रमक**

तुम्ही कोयते हातात घेणार तर मराठ्यांच्या हातात तलवारी आहेत असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी सोलापूरमध्ये दिला. बावनकुळेला एवढी टोकाची भूमिका घेण्याची गरज नाही. जर तुम्ही चूक सुधारली नाही तर तुमचा पक्ष खड्ड्यात गेला म्हणून समजा, असा इशारा देखील जरांगे यांनी दिला. मराठ्यांचे भाजप मधील आमदार, मंत्र्यांनी फडणवीसांना सांगावं की बावनकुळेची चूक सुधारावी. तुमची गाठ आता मराठ्यांशी आहे हे लक्षात ठेवा. ज्याची चूक असेल त्याला मी सोडत नाही,छगन भुजबळ बद्दल तुम्हाला माहितीच आहे, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. सर्व मराठ्यांनी अगोदर समाज आणि नंतर पक्ष हे लक्षात ठेवावं, कोणी गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न करू नये, या लोकांना आपण सत्तेवर बसवलं आहे, असंही जरांगे पाटील म्हटलं.

# सरकारकडून शेतकऱ्यांची लूट : नाना पटोले

**वृत्तसंस्था, मुंबई**

राज्यातील कृषी संकटावर संताप व्यक्त करत पटोले म्हणाले, सध्या शेतीचा हंगाम सुरू असताना राज्यभरात खतांचा आणि बियाणांचा प्रचंड तुटवडा आहे. बाजारात बोगस बियाणे आणि बनावट खते सर्रास विकली जात असून शेतकऱ्यांना लुटले जात असल्याची टीका काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी केली आहे.



सध्याच्या राजकीय घडमोडींवर बोलताना काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे. सध्या शेतकऱ्यांवर अस्मानी व सुलतानी सकंट आलेले आहे व सरकारचा भ्रष्ट कारभार सुरू आहे.

तसेच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मोठा त्रास होत आहे आणि याच त्रासाची तक्रार करण्यासाठी शिंदे हे दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीला गेले होते, असा खळबळजनक दावा पटोले यांनी केला आहे. पुढे बोलताना पटोले म्हणाले, अकोल्यातील घटनेवरून स्पष्ट झाले आहे की, सरकारच या बोगस कंपन्यांना पाठीशी घालत आहे. इतकेच काय तर शासकीय महाबीज महामंडळसुद्धा बोगस बियाणे विकत असल्याचे उघड झाले आहे. या भ्रष्ट कारभारामुळे आज देशात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या महाराष्ट्रात होत आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत धुसफूस आणि प्रशांत किशोर यांच्या भूमिकेवर ते म्हणाले, प्रशांत किशोर पक्षांचे प्रमोशन करण्याचे टेंडर घेतात. राष्ट्रवादीतील तो त्यांचा अंतर्गत वाद असून काँग्रेसला त्यात पडण्याचे कारण नाही. मराठा आणि ओबीसी आरक्षणावर बोलताना पटोले म्हणाले, २०१४ पासून भाजप, देवेंद्र फडणवीस आणि नितीन गडकरी यांनी मराठा, ओबीसी, धनगर, बंजारा आणि गोवारी समाजाला आरक्षणाची खोटी आश्वासने दिली. केवळ जातीजातीत तेढ निर्माण करून मतांचे राजकारण केले जात आहे.

केंद्रातील आणि राज्यातील भाजपा सरकारने जनतेला वाऱ्यावर सोडून सत्ताधारी मजा मारत आहेत. राज्यात कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे बिघडलेली आहे, महागाई, बेरोजगारीने लोकांना जगणे कठीण झाले आहे. सरकारकडून बियाणे आणि खतांचा काळा बाजार करून शेतकऱ्यांची लूट सुरू आहे. अनेक परीक्षांचे पेपर फोडून विद्यार्थ्यांचे भविष्य उद्धवस्त करत असल्याची टीकाही या प्रसंगी नाना पटोले यांनी केली.

दैनिक सिंहवाणी वृत्त



संपादकीय लेखणीतून...

# यूपीआय आता निशुल्क नाहीच!

अतिशय लोकप्रिय बनलेले युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस (यूपीआय) प्रणालीद्वारे होणाऱ्या व्यवहारांवर प्रक्रिया शुल्क आकारणीच्या (मर्चंट डिस्काऊंट रेट-एमडीआर) दिशेने केंद्र सरकारने पाऊल टाकले आहे असे दिसते. या संदर्भात सरकारने मांडलेले कर दुरुस्ती विधेयक गुरुवारी लोकसभेत प्रचंड गदारोळात मंजूर झाले. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टीम कायदा दुरुस्ती विधेयक लोकसभेत मांडले. या विधेयकाला चर्चेविना आवाजी मतदानाने मंजुरी देण्यात आली. ऑनलाईन व्यवहारांवर सेवा पुरवठादार बँका आणि देयक कंपन्यांना शुल्क आकारणी करण्यास असलेली मनाईची तरतूद या विधेयकाद्वारे रद्द करण्यात आली आहे. आरटीजीएस आणि एनईएफटी व्यवहारांवर सध्या शुल्क आकारणी केली जाते. मात्र, यूपीआय आणि रुपे कार्ड व्यवहारांवर सध्या शुल्क आकारणी केली जात नाही. मंजूर विधेयकामुळे या व्यवहारांवर शुल्क आकारणीची वाट आता मोकळी झाली आहे. प्रक्रिया शुल्क आकारणी करण्यासाठी या विधेयकामुळे सरकारला कायदेशीर बदल करता येणार आहे. ग्राहक आणि छोट्या व्यवसायांना डिजिटल व्यवहारांवर अल्प शुल्क आकारणी करून बँका आणि देयक सेवा पुरवठादार कंपन्यांना शाश्वत महसुलाचे साधन उपलब्ध करून देण्याचा सरकारचा यामागे हेतू आहे. डिजिटल देयक परिसंस्था चालविणा-या कंपन्यांनाही यातून महसुलाचा स्त्रोत उपलब्ध होणार आहे. यूपीआयच्या माध्यमातून जुलैमध्ये २३.६ अब्ज व्यवहार झाले असून, ते एकूण २९.९ लाख कोटी रुपयांचे आहेत. या कर आणि इतर कायदे (सुधारणा) विधेयक २०२६ चा मुख्य उद्देश देशात विदेशी गुंतवणुकीला गती देणे आणि मेक इन इंडिया उपक्रमांतर्गत इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाला मोठे प्रोत्साहन देणे हा आहे. जागतिक पातळीवर बदलणाऱ्या आर्थिक आणि पुरवठा साखळीच्या पार्श्वभूमीवर, उद्योगक्षेत्रात गुंतवणूक वाढवून ईज ऑफ डुईंग बिझनेसला चालना देण्याची सरकारची योजना आहे. यासाठी हे विधेयक प्राप्तिकर कायदा २०२५, वित्त कायदा तसेच पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टम ॲक्ट, २००७ मध्ये आवश्यक बदल प्रस्तावित करते. या सुधारणांमुळे सर्वसामान्यांच्या थेट प्राप्तिकरात कोणताही बदल होणार नाही. मात्र, फॉरेन पोर्टफोलिओ इन्व्हेस्टर्सना (एफपीआय) सरकारी रोख्यांमधील गुंतवणुकीवरील व्याज आणि कॅपिटल गेन्सवर करात सवलत मिळण्याची शक्यता आहे. यामुळे देशात मोठा विदेशी निधी येऊन नवीन उद्योगांसोबतच रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतील. या विधेयकातील पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टम्स ॲक्टच्या कलम १० ए मध्ये दुरुस्तीचा प्रस्ताव ठेवला आहे.

सध्याच्या कायद्यानुसार बँका आणि पेमेंट सेवा पुरवठादार (पीएसपी) यांना यूपीआय आणि रुपे डेबिट कार्ड व्यवहारांवर एमडीआर आकारता येत नाही. प्रस्तावित दुरुस्तीनंतर ही कायमस्वरूपी सवलत हटवली जाईल. त्याऐवजी केंद्र सरकार वेळोवेळी अधिसूचना काढून कोणत्या इलेक्ट्रॉनिक पेमेंटवर शून्य एमडीआर राहील आणि कोणत्या व्यवहारांवर मर्चंट शुल्क लागू होईल, हे ठरवू शकेल. मर्चंट डिस्काऊंट रेट (एमडीआर) म्हणजे डिजिटल व्यवहार प्रक्रिया करण्यासाठी व्यापाऱ्यांकडून बँका आणि पेमेंट सेवा कंपन्यांना दिले जाणारे शुल्क सध्या भारतात क्रेडिट कार्ड व्यवहारांवर सुमारे १.५ टक्के, तर डेबिट कार्ड व्यवहारांवर ०.९ टक्क्यांपर्यंत एमडीआर आकारला जातो. मात्र यूपीआय व्यवहारांवर सध्या कोणतेही एमडीआर लागू नाही. यूपीआय व्यवहारांमध्ये सातत्याने विक्रमी वाढ होत आहे. जुलै महिन्यात यूपीआयद्वारे २३.६ अब्ज व्यवहार झाले असून त्यांची एकूण किंमत २९.९ लाख कोटी रुपये इतकी होती. फोन पे आणि गुगल पे यासारख्या प्लॅटफॉर्मचा या व्यवहारांमध्ये मोठा वाटा आहे. पेमेंट उद्योगाशी संबंधित कंपन्यांचे म्हणणे आहे की, यूपीआय व्यवहारांवर कोणतेही शुल्क मिळत नसल्यामुळे पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि सेवांमध्ये गुंतवणूक करणे अधिक कठीण होत आहे. त्यामुळे या क्षेत्राच्या दीर्घकालीन विकासासाठी एमडीआर आवश्यक असल्याचा उद्योगाचा दावा आहे. सरकार सध्या दोन प्रमुख पर्यायांवर विचार करत असण्याची शक्यता आहे. पहिले म्हणजे ठराविक मर्यादेपेक्षा जास्त रकमेच्या यूपीआय व्यवहारांवर एमडीआर लागू करणे आणि दुसरे म्हणजे, व्यापाऱ्याच्या वार्षिक उलाढालीच्या आधारावर शुल्क आकारणे. एका अंदाजानुसार, वार्षिक दीड कोटी रुपयांपेक्षा जास्त उलाढाल असलेल्या व्यापा-यांकडे दोन हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या यूपीआय व्यवहारांवर ०.३ ते ०.५ टक्के एमडीआर आकारण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. मात्र लहान व्यापारी आणि सामान्य ग्राहकांसाठी यूपीआय व्यवहार पूर्वीप्रमाणेच विनाशुल्क ठेवण्याचा प्रस्तावही सरकारसमोर आहे. सध्या तरी सामान्य ग्राहकांसाठी कोणतेही शुल्क लागू करण्याचा निर्णय झालेला नाही. प्रस्तावित बदलांचा मुख्य भर मोठ्या व्यापाऱ्यांवरील एमडीआरवर असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे लहान व्यापारी आणि सर्वसामान्य यूपीआय वापरकर्त्यांवर तात्काळ आर्थिक भर पडण्याची शक्यता कमी मानली जात आहे. ब्रोकरेज संस्थांच्या अंदाजानुसार दोन हजार रुपयांपेक्षा जास्त रकमेचे व्यवहार व्यापारी पेमेंटच्या एकूण मूल्यांपैकी सुमारे ६७ टक्के आहेत. या व्यवहारांवर एमडीआर लागू झाल्यास डिजिटल पेमेंट उद्योगाला सुमारे दहा हजार कोटी रुपयांचे अतिरिक्त वार्षिक उत्पन्न मिळू शकते. विधेयक संसदेत मंजूर झाले तरी लगेच दुस-या दिवशीपासून यूपीआयवर शुल्क लागू होणार नाही.

हा केवळ एक कायदेशीर बदल आहे. ज्याद्वारे सरकारला निर्णय घेण्याचे अधिकार मिळतील. सर्वसामान्य ग्राहकांसाठी सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे, एमडीआर हा मर्चंट चार्ज असतो. म्हणजेच तुम्ही जेव्हा दुकानदाराला यूपीआयने पैसे देता, तेव्हा तुमच्या बँक खात्यातून कोणतेही अतिरिक्त पैसे कापले जात नाहीत. हा खर्च दुकानदाराला किंवा व्यापाऱ्याला उचलावा लागतो. मात्र, अप्रत्यक्षपणे याचा फटका ग्राहकांना बसू शकतो. कारण दुकानदारांना हा चार्ज द्यावा लागला तर ते वस्तूंच्या किमती किंचित वाढवू शकतात किंवा मिळणाऱ्या ऑफर्स आणि सवलती कमी करू शकतात. तज्ज्ञांच्या मते, जर भविष्यात यूपीआयवर एमडीआर लागू झाला, तर त्याचा सर्वाधिक फटका लहान व्यावसायिक आणि किराणा दुकानदारांना बसू शकतो. अतिरिक्त खर्च टाळण्यासाठी हे लहान दुकानदार ग्राहकांकडून क्यूआर कोड ऐवजी रोख रकमेची मागणी करू शकतात. त्यामुळे देशातील वाढत्या डिजिटल पेमेंटच्या गतीला काही प्रमाणात ब्रेक लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# विठ्ठल माऊलीच्या चरणी एसटीचा 'विक्रमी' नवस; उत्पन्न ४१ कोटी पार!

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

महाराष्ट्र आणि जगभरातील लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असलेल्या पंढरपूरच्या आषाढी एकादशी यात्रेनिमित्त महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने केलेल्या अत्यंत सुटसुटीत, नियोजनबद्ध आणि अविरत सेवेला भाविकांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. यंदाच्या आषाढी यात्रेदरम्यान एसटीच्या सुमारे ५,५०० विशेष बसेसमधून ९ लाखांहून अधिक भाविकांनी पंढरपूरला विठूरायाच्या दर्शनासाठी सुरक्षित आणि आरामदायी प्रवास केला. या अभूतपूर्व प्रतिसादाच्या जोरावर एसटी महामंडळाला ४१.१८ कोटींहून अधिकचे उत्पन्न मिळाले असून, गतवर्षीच्या तुलनेत तब्बल ५.३० कोटींची घसघशीत वाढ नोंदवली गेली आहे. खाजगी वाहतुकीचे अनेक पर्याय उपलब्ध असतानाही वारकऱ्यांनी पुन्हा एकदा 'लालपरी'वर दाखवलेला हा असीम विश्वास कौतुकास्पद आणि महामंडळाचा गौरव वाढवणारा ठरला आहे.

**वारकरी आणि लालपरी: पिढ्यानपिढ्यांचे जिव्हाळ्याचे नाते**

'गावोगावी धावणारी लालपरी' ही केवळ वाहतुकीचे साधन नसून महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. वारीची परंपरा जितकी प्राचीन आहे, तितकेच पंढरपूरच्या वारीचे आणि एसटीचे नातेही जुने आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून, दुर्गम खेड्यापाड्यांतून वृद्ध, महिला, लहान मुले आणि टाळकरी-वारकऱ्यांना पंढरीच्या वेशीपर्यंत सुरक्षितपणे पोहोचवण्याचे मुख्य कार्य एसटी महामंडळ निष्ठेने करत आले आहे.

वारीत चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पायाला फोड आले तरी, त्यांच्या चेहऱ्यावर विठूरायाच्या दर्शनाची आस असते. अशा वेळी परतीच्या प्रवासात किंवा मुख्य यात्रेच्या दिवशी एसटीचा प्रवास हा वारकऱ्यांसाठी अत्यंत दिलासादायक ठरतो. यंदा एसटी महामंडळाने भाविकांची प्रचंड गर्दी लक्षात घेऊन अत्यंत सूक्ष्म नियोजन केले होते, ज्यामुळे लांबच्या पल्ल्यावरून येणाऱ्या वारकऱ्यांना प्रवास करणे सुलभ झाले.

**आकडेवारीच्या नजरेतून यंदाचा आषाढी यात्रा हंगाम:**

यंदाच्या आषाढी यात्रेदरम्यान एसटी महामंडळाने बजावलेल्या प्रभावी कामगिरीचे वास्तव या आकडेवारीतून स्पष्टपणे अधोरेखित होते. भाविकांच्या सोयीसाठी महामंडळाने ५,५०० हून अधिक विशेष बसेसची सेवा उपलब्ध करून दिली होती, ज्याद्वारे ९ लाखांपेक्षा जास्त वारकऱ्यांनी पंढरपूरचा सुरक्षित प्रवास केला. या अभूतपूर्व प्रतिसादाच्या जोरावर एसटीला ४१.१८ कोटींहून अधिकचे एकूण महसूल मिळाले असून, गतवर्षीच्या तुलनेत उत्पन्नात तब्बल ५.३० कोटींची घसघशीत वाढ नोंदवली गेली आहे. प्रवाशांची ही प्रचंड गर्दी



आणि शहरातील वाहतूक सुरळीत हाताळण्यासाठी पंढरपूरच्या चारही बाजूंना ४ प्रमुख तात्पुरती बसस्थानके उभारण्यात आली होती. ही आकडेवारी केवळ आर्थिक यशाची साक्ष देत नसून, एसटी प्रशासनाचे उत्कृष्ट नियोजन आणि प्रवाशांचा महामंडळावर असलेला दृढ विश्वास सिद्ध करते.

**प्रवाशांच्या सोयीसाठी ४ तात्पुरती बसस्थानके:**

पंढरपूर शहरात आषाढी यात्रेदरम्यान लाखो भाविक एकत्र येतात. या काळात शहरात होणारी प्रचंड वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आणि प्रवाशांना त्यांच्या दिशेने जाणाऱ्या बसेस सहज उपलब्ध व्हाव्यात यासाठी एसटी महामंडळाने पंढरपूरच्या चार मुख्य दिशांना तात्पुरती बसस्थानके उभारली होती:

चंद्रभागा बसस्थानकः कोल्हापूर, सांगली, सातारा आणि कोकण भागातून येणाऱ्या व जाणाऱ्या गाड्यांसाठी.

भीमा बसस्थानकः पुणे, नगर, नाशिक आणि मुंबई विभागातील गाड्यांसाठी.

विठ्ठल बसस्थानकः सोलापूर, मराठवाडा आणि लातूर मार्गावरील वाहतुकीसाठी.

पांडुरंग बसस्थानकः खानदेश, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्रातून येणाऱ्या बसेससाठी. या तात्पुरत्या स्थानकांमुळे मुख्य शहरातील वाहतुकीवर ताण पडला नाही आणि प्रवाशांनाही आपल्या भागातील बस पकडणे सोपे झाले.

**शासकीय योजना आणि प्रवासी वाढीची मुख्य कारणे**

यंदा एसटीच्या उत्पन्नात आणि प्रवासी संख्येत झालेल्या विक्रमी वाढीमागे काही प्रमुख कारणे आणि शासकीय **योजनांचा मोठा वाटा आहे:**

महिला सन्मान योजनाः राज्य शासनाने महिलांना एसटी प्रवासात दिलेली ५०% भाडे सवलत महिला वारकऱ्यांसाठी अत्यंत फायदेशीर ठरली. यामुळे यंदा महिला भाविकांची संख्या लक्षणीय होती.

७५ वर्षांवरील ज्येष्ठांना मोफत प्रवासः 'अमृत ज्येष्ठ नागरिक योजने'अंतर्गत ७५ वर्षांवरील वृद्धांना मोफत प्रवासाची सुविधा मिळाल्याने अनेक ज्येष्ठ वारकऱ्यांना विठूरायाचे दर्शन घेणे शक्य झाले.

अतिरीक्त फेऱ्यांचे आयोजनः गर्दीच्या वेळेनुसार स्थानिक डेपोमधून त्वरित जादा बसेस सोडण्यात आल्या, ज्यामुळे प्रवाशांना तासन्तास ताटकळत राहावे लागले नाही.

**अहोरात्र सेवा देणारे कर्मचारी आणि अधिकारी**

हा भलामोठा वाहतूक सोहळा निर्विघ्नपणे पार पाडण्यामागे एसटी महामंडळाच्या हजारो कर्मचाऱ्यांचा अहोरात्र घाम गाळणारा परिश्रम आहे.

चालक आणि वाहकः हजारो किलोमीटरचा प्रवास थकवा न मानता सुरक्षितपणे पूर्ण करणारे चालक आणि प्रवाशांशी आपुलकीने वागणारे वाहक हे या यशाचे खरे शिल्पकार आहेत.

यांत्रिक कर्मचारी (मेकॅनिक): रस्त्यात कुठलीही गाडी बंद पडल्यास ती त्वरित दुरुस्त करण्यासाठी ठिकठिकाणी मोबाईल रिपेअरिंग व्हॅन आणि मेकॅनिक तैनात करण्यात आले होते. सुरक्षा व रहदारी नियंत्रकः पंढरपूर परिसरात प्रवाशांचे रांगेत नियोजन करणे, गर्दी नियंत्रणात ठेवणे आणि सुरक्षेची काळजी घेणे यासाठी विशेष पथके तैनात करण्यात आली होती.

आजच्या तंत्रज्ञानप्रचुर आणि गतिमान युगात खाजगी ट्रॅव्हल्स, ॲप-आधारित टॅक्सी सेवा आणि वैयक्तिक वाहनांसारखे अनेक हायटेक व सोयीस्कर पर्याय उपलब्ध असतानाही, आषाढी यात्रेच्या वेळी महाराष्ट्रातील लाखो वारकरी जेव्हा पुन्हा एकदा एसटी महामंडळाच्याच गाड्यांना आपली पहिली पसंती देतात, तेव्हा तो केवळ एका वाहतूक व्यवस्थेचा निवडप्रपंच राहत नाही, तर तो पिढ्यानपिढ्या जपलेल्या एका असीम श्रद्धा आणि आत्मिक विश्वासाचा जिवंत पुरावा ठरतो. ग्रामीण भागातील अगदी शेवटच्या टोकावर राहणाऱ्या वारकऱ्याला सुरक्षित, अल्पखर्ची आणि विश्वासार्ह प्रवासाची खात्री फक्त आणि फक्त 'लालपरी'च देऊ शकते. वारीच्या काळात प्रवाशांची होणारी अभूतपूर्व गर्दी लक्षात घेऊन एसटी प्रशासनाने केलेले दिशादर्शक व सूक्ष्म नियोजन, तात्पुरती बसस्थानके उभारून दिलेली सुटसुटीत सेवा, आणि मुख्य म्हणजे अहोरात्र प्रवाशांच्या सेवेत तत्पर असणाऱ्या चालक-वाहकांची आपुलकीची वागणूक यांमुळेच हा भव्य प्रवास सोहळा अत्यंत सुखकर आणि सुरक्षित पार पडतो. शासनाच्या विविध सवलत योजनांचा लाभ घेत जेव्हा हजारो ज्येष्ठ नागरिक आणि महिला भाविक विठूरायाच्या दर्शनासाठी एसटीतून प्रवास करतात, तेव्हा एसटी ही केवळ एक वाहतूक संस्था उरत नाही, तर ती संपूर्ण महाराष्ट्राला एकत्र बांधणारी खरीखुरी 'जीवनवाहिनी' म्हणून उभी राहते. त्यामुळे आषाढी यात्रेतील ४१ कोटींहून अधिकचे विक्रमी उत्पन्न हे केवळ आकडेवारीतील यश किंवा आर्थिक नफा नसून, एसटी महामंडळाच्या 'प्रवाशांच्या सेवेसाठी' या मूळ ब्रीदवाक्यावर आणि तिच्या अखंड जनसेवेवर जनतेने मारलेली विश्वासाची आणि आदराची सर्वात मोठी मोहोर आहे.

- ९५६१५९४३०६

# दुखापतींनी केवळ टिम इंडियालाच नाही तर श्रीलंकेलाही घेरले!

भारतीय संघ सध्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी श्रीलंकेच्या दौऱ्यावर आहे. आयसीसी जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या दृष्टीने ही मालिका दोन्ही संघांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. मात्र, मालिका सुरू होण्यापूर्वीच संघासमोर खेळाडूंच्या दुखापतींचे संकट उभे राहिले आहे. श्रीलंका संघाचा एक स्टार खेळाडू जखमी झाल्याने संघाचा तणाव आणखी वाढला आहे. श्रीलंकेच्या मर्यादित षटकांच्या संघाचा कर्णधार, कुसल मेंडिस, जखमी झाला आहे. २०२६ च्या लंका प्रीमियर लीग (एलपीएल) दरम्यान त्याला हॅमस्ट्रिंगची दुखापत झाली. या लीगमध्ये तो कोलंबो कॅप्सचे नेतृत्व करत होता.

**दुखापतीवर उपचार सुरू**

श्रीलंका क्रिकेट बोर्डाने कुसल मेंडिसच्या दुखापतीबाबत एक निवेदन जारी केले आहे, ज्यात म्हटले आहे की तो सध्या नॅशनल हाय परफॉर्मन्स सेंटरमध्ये आपल्या दुखापतीवर उपचार घेत आहे. या निवेदनात त्याच्या दुखापतीबद्दल अधिक माहिती देण्यात आलेली नाही, ज्यात तो कधी बरा होईल किंवा त्याला किती वेळ लागेल याचा समावेश नाही. निवेदनात म्हटले आहे की, "१९ जुलै रोजी एसएससी येथे कँडी रॉयल्सविरुद्ध कोलंबो कॅप्सच्या सामन्यादरम्यान धाव घेताना मेंडिसच्या स्नायूला दुखापत झाली. परिणामी, पुढील पुनर्वसनासाठी त्याला राष्ट्रीय



डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

उच्च कामगिरी केंद्रात (नॅशनल हाय परफॉर्मन्स सेंटर) हलवण्यात येईल."

**श्रीलंकेसाठी संकट**

जर मेंडिसची दुखापत बरी झाली नाही, तर श्रीलंकेच्या संघासाठी ही एक कठीण परिस्थिती असेल. मालिका सुरू होण्यापूर्वी अवघे दोन आठवडे शिल्लक असताना, मेंडिस बरा होण्याची शक्यता कमी वाटते. श्रीलंका क्रिकेट बोर्डाने अद्याप त्याच्या बरे होण्यासाठी कोणतीही कालमयार्दा दिलेली नाही. १५ ऑगस्ट रोजी गॉले येथे सुरू होणाऱ्या कसोटी मालिकेत मेंडिस एक महत्त्वाचा खेळाडू आहे. त्याच्या अनुपस्थितीचा संघाच्या फलंदाजीवर परिणाम होईल. खेळाडू जखमी झाल्याने संघाचा तणाव आणखी वाढला आहे.

**टिम इंडियाही दुखापतींच्या विळख्यात**

पाहुण्या टिम इंडियाच्या पाठीमागे तर दुखापतींचा ससेमिराच सुरू झाला आहे. भारतीय कर्णधार शुभमन गिलला गुरुवारी सराव सत्रादरम्यान अंगठ्याला दुखापत झाली, त्यामुळे भारतीय संघात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. भारतीय संघ शुक्रवारपासून श्रीलंका क्रिकेट इलेव्हनविरुद्ध तीन दिवसीय सराव सामना खेळत आहे त्याच्या ऐवजी के एल राहुल संघाचे नेतृत्व करत आहे.

भारतीय संघ गेल्या काही काळापासून दुखापतींशी झुंजत आहे. गिलच्या दुखापतीमुळे त्यांच्या चिंतेत आणखी भर पडू शकते. हे लक्षात घेण्यासारखे आहे की भारतीय संघ मंगळवारी श्रीलंकेत दाखल झाला आणि गुरुवारी त्याने आपले पहिले सराव सत्र घेतले.

**साई सुदर्शन लवकरच संघात सामील होण्याची शक्यता**

संघासोबत श्रीलंकेला न गेलेला महत्वाचा फलंदाज साई सुदर्शन सध्या बंगळूरु येथील बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये दुखापतीतून सावरत आहे. त्याच्या पायाच्या बोटाला किरकोळ दुखापत झाली आहे, परंतु त्याने नेटमध्ये फलंदाजीचा सराव पुन्हा सुरू केला आहे. वैद्यकीय पथकाकडून परवानगी मिळाल्यानंतर तो ८ ऑगस्टपर्यंत कोलंबोमध्ये संघात सामील होऊ शकेल अशी अपेक्षा आहे. मात्र, असे झाल्यास तो ७ ऑगस्टपासून सुरू होणारा तीन दिवसीय सराव सामना खेळू शकणार नाही.

२४ वर्षीय सुदर्शनला भारतीय कसोटी संघात तिसऱ्या क्रमांकासाठी एक महत्त्वाचा पर्याय मानले जाते. त्याने आतापर्यंत सात कसोटी सामन्यांमध्ये ३९ च्या सरासरीने ३८३ धावा केल्या आहेत, ज्यात तीन अर्धशतकांचा समावेश आहे.

दुखापतीमुळे श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेला मुकलेले किंवा अनफिट असलेले प्रमुख भारतीय खेळाडू म्हणजे वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह (गुडघ्याची दुखापत), अष्टपैलू हार्दिक पांड्या व नितीश कुमार रेड्डी (क्वाड्रिसेप्स स्नायूंची दुखापत), तसेच वॉशिंग्टन सुंदर, वरुण चक्रवर्ती आणि हर्षित राणा (हॅमस्ट्रिंग दुखापत) हे होत. याशिवाय युवा फलंदाज साई सुदर्शन पायाच्या दुखापतीमुळे सुरुवातीला संघासोबत प्रवास करू शकलेला नाही आणि कर्णधार शुभमन गिललाही सराव सामन्यादरम्यान बोटाला दुखापत झाली आहे.

**संघासोबत चार नेट गोलंदाजही आहेत**

श्रीलंकेतील परिस्थिती लक्षात घेता, भारतीय संघाला तयारीसाठी मदत करण्याकरिता बीसीसीआयने चार अतिरिक्त नेट गोलंदाजही पाठवले आहेत. हर्ष दुबे, शिवांग कुमार, तनुष कोटियन आणि विप्रज निगम संघात सामील झाले असून ते पहिल्या कसोटीच्या तयारीसाठी फलंदाजांना साहाय्य करतील.

भारताने शेवटचा श्रीलंकेचा कसोटी दौरा २०१७ मध्ये केला होता. त्यावेळी विराट कोहली कर्णधार होता आणि भारतीय संघ कसोटी क्रमवारीत अव्वल स्थानी होता. नऊ वर्षांनंतर, परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. सध्याच्या संघातील बहुतेक खेळाडू श्रीलंकेत पहिल्यांदाच कसोटी क्रिकेट खेळणार आहेत. विश्व कसोटी चॅम्पियनशिपच्या शर्यतीतही ही मालिका महत्त्वपूर्ण आहे.

भारत आणि श्रीलंका यांच्यात आतापर्यंत एकूण ४६ कसोटी सामने खेळले गेले आहेत, भारताने २२ सामने जिंकले आहेत आणि श्रीलंकेने ७ सामने जिंकले आहेत, तर १७ सामने अनिर्णित राहिले आहेत. भारत गेल्या ११ वर्षांपासून (२०१५ पासून) श्रीलंकेविरुद्ध कसोटी क्रिकेटमध्ये अपराजित आहे.

**सामना आकडेवारी (हेड-टू-हेड रेकॉर्ड)**

एकूण खेळलेले सामनेः ४६, भारताचे विजयः २२, श्रीलंकेचे विजयः ७, अनिर्णित सामनेः १७.

**श्रीलंकेच्या भूमीवर : -**

श्रीलंकेमध्ये या दोन संघांमध्ये एकूण २४ कसोटी सामने खेळले गेले आहेत. यापैकी, भारताने ९ सामने जिंकले आणि श्रीलंकेने ७ जिंकले, तर ८ सामने अनिर्णित राहिले. भारतीय संघ २०१५ पासून श्रीलंकेत एकही कसोटी मालिका हरलेला नाही.

सध्याचा दौरा (२०२६) : - शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ ऑगस्ट २०२६ मध्ये दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी श्रीलंकेला जाईल. मालिकेतील पहिला सामना १५ ऑगस्ट, २०२६ रोजी होईल.

डब्ल्यूटीसी फायनलचा विचार करता भारतीय संघासाठी हि मालिका खूप महत्वाची असल्याने प्रमुख खेळाडूंना झालेल्या दुखापतींमुळे संघापुढे आव्हान उभे राहिले आहे. आता गिल आणि कंपनी या संकटांवर कशी मात करतात हे येणारा काळच दाखवून देईल.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# मराठा समाजाला न्याय देताना ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही!

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा स्पष्ट निर्धार, बुलेट ट्रेन प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाईचे संकेत

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
मराठा समाजाच्या न्याय्य मागण्यांबाबत राज्य सरकार सकारात्मक असून,मराठा समाजाला न्याय देताना ओबीसी समाजावर अन्याय होणार नाही आणि ओबीसींना न्याय देताना मराठा समाजाच्या हक्कांवरही गदा येणार नाही,याची सरकार पूर्ण काळजी घेत आहे,असे महसूलमंत्री तथा नागपूर आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले.
वर्धा येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी विविध विषयांवर सरकारची भूमिका स्पष्ट केली. मनोज जरांगे यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर बोलताना बावनकुळे म्हणाले, मी कालही सांगितले, परवाही सांगितले आणि आजही सांगतो, महाराष्ट्र सरकार पूर्णपणे मराठा समाजाच्या बाजूने आहे. मराठा समाजाला न्याय देतानाच ओबीसी समाजालाही न्याय मिळाला पाहिजे आणि ओबीसी समाजाला न्याय देताना मराठा समाजाच्या हक्कांवरही गदा येता कामा नये,या भूमिकेतून सरकार काम करीत असल्याचे त्यांनी सांगितले.
जरांगे यांच्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना बावनकुळे म्हणाले की, कोणाच्या विरोधात वागणे किंवा कोणावर आरोप करणे हा आपला स्वभाव नाही.मराठा समाजाबद्दल माज्या मनात कुठलीही वेगळी भूमिका नाही.मी जसा ओबीसी समाजाच्या घरातला आहे,तसाच मराठा समाजाच्याही घरातला आहे. परिवारात आम्ही कधी भेदभाव करत नाही. मराठा समाजाला त्यांच्या हक्काचे जे काही आहे, ते मिळवून देण्यासाठी आम्ही काम करीत आहोत,असे त्यांनी स्पष्ट केले.

**ऑनलाइन निविदा प्रक्रिया पारदर्शक**

नाशिक कुंभमेळ्यातील कामांच्या निविदांबाबत राज ठाकरे यांनी केलेल्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना बावनकुळे यांनी ऑनलाइन निविदा प्रक्रिया पारदर्शक असल्याचे सांगितले. संबंधितांनी निविदांची यादी घेऊन वस्तुस्थिती तपासून बोलावे, असेही ते म्हणाले. ऑनलाइन निविदा प्रक्रियेत कोणत्याही राज्यातील ठेकेदाराला सहभागी होता येते. उदाहरणार्थ, आर्वी येथे ३०० खाटांचे रुग्णालय बांधण्यासाठी निविदा निघाली,तर कोणत्याही राज्यातील ठेकेदार त्यात सहभागी होऊ शकतो. कोणत्या राज्यातील ठेकेदार येईल, यावर बंधन नसते. गुणवत्तेला महत्त्व दिले जाते, असे बावनकुळे यांनी सांगितले.
विकासकामे वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण होणे आवश्यक असून, कामांमध्ये कोणतीही दिरंगाई होणार नाही, याची काळजी घेतली जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

**बुलेट ट्रेन प्रकरणाची चौकशी करणार**

पालघर येथील बुलेट ट्रेन प्रकल्पातील कथित गैरव्यवहाराबाबत विचारले असता बावनकुळे यांनी या प्रकरणाची चौकशी करण्याचे स्पष्ट संकेत दिले. आज सकाळीच ही बातमी पाहिली असून, माज्याकडे यासंदर्भातील पत्रही आले आहे. बुलेट ट्रेनचे बांधकाम सुरू असताना काही लोकांनी परस्पर बांधकाम करून त्या बांधकामाच्या मोबदल्यात अधिक रक्कम उचलल्याचा आरोप आहे. या प्रकरणाची चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

**पंतप्रधानांच्या भेटीगाठी होत असतात**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची विविध नेते विकासकामांसंदर्भात भेट घेत असतात.त्यामुळे शरद पवार गटातील नेते पंतप्रधानांची भेट घेणार असल्याच्या चर्चेबाबत वेगळे भाष्य करण्याची आवश्यकता नसल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.पंतप्रधानांच्या भेटीगाठी होत असतात. विविध लोक विकासकामांसाठी त्यांची भेट घेत असतात,असे ते म्हणाले.
सुनील तटकरे यांच्याशी संबंधित राष्ट्रवादी काँग्रेसमधील प्रश्नांवर विचारले असता, राष्ट्रवादी काँग्रेस गटाचे प्रश्न त्यांच्या नेत्यांना विचारा,असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

## अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त सामाजिक कार्यकर्ते व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
साहित्य भूषण अण्णाभाऊ साठे स्मारक ट्रस्ट चिंचभवन, नागपूर च्यावतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे केवळ चतुरस्त्र साहित्यिक नव्हते, तर ते क्रांतिकारक समाजसुधारक होते. आपल्या साहित्याच्या माध्यमातून त्यांनी वंचित, शोषित आणि उपेक्षित समाजाच्या वेदनांना वाचा फोडून सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा दिली, असे प्रतिपादन प्रमुख वक्ते अरविंद डोंगरे यांनी केले.
साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त तसेच लेखन प्रेरणा दिनानिमित्त साहित्य भूषण अण्णाभाऊ साठे स्मारक ट्रस्टच्यावतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन १ ऑगष्टला करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लहानुजी इंगळे होते. प्रमुख अतिथी पाहुणे म्हणून कु. लक्ष्मी हत्तीठेले, नगरसेविका तथा सभापती, दुर्बल घटक समिती, मनपा नागपूर उपस्थित होत्या कार्यक्रमाची सुरुवात साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकास अभिवादन करून करण्यात आली.
प्रारंभी नवोदित गायकांनी सादर केलेल्या कराओके गायनाने उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर प्रमुख वक्त्यांची समयोचित भाषणे झाली. यावेळी 'अण्णाभाऊ साठे यांचा जीवनसंघर्ष आणि आजचे वास्तव' या विषयावर अरविंद डोंगरे यांनी मार्गदर्शन केले.
तसेच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक रविंद्र खांडेकर आणि देवेंद्र काटे यांनी विद्यार्थी व पालकांना स्पर्धा परीक्षांच्या तयारीबाबत मार्गदर्शन केले. सामाजिक कार्यकर्त्यांचा गौरव अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त उत्कृष्ट सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींचा समाजभूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.
यावेळी महादेव जाधव, सुश्री सुधाताई बावणे, प्रभाकर शिंदे, अंबादास कुचेकर आणि विनायक इंगोले यांचा समावेश होता. तसेच कला क्षेत्रातील योगदानाबद्दल गायक सुनील वाघमारे, गिटारवादक राकेश वानखेडे आणि तबलावादक अशोक डोके यांना 'समाज गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. यानंतर मान्यवरांच्या हस्ते मातंग समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करून त्यांच्या यशाचे कौतुक करण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रोत्साहन मिळाले.
कार्यक्रमाला डी.एम. कावळे, नत्थूजी उकुंडे, रविंद्र वानखेडे, सुचेता कांबळे यांच्यासह विद्यार्थी, पालक आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ट्रस्टचे कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर (नानाजी) प्रधान, मुख्य सचिव अशोक हटवार, मनिष वानखेडे, क्रांती भावे, रमेश इंगोले, योगेश धनकासार आणि ट्रस्ट चे सर्व पदाधिकारी व विश्वस्त यांनी परिश्रम घेतले.

## माजी विद्यार्थ्यांकडून शिक्षकांचा गुरुसन्मान



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**
द्रुगधामना हायस्कूलमधील २००४-०५ या शैक्षणिक वर्षातील माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी गुरुसन्मान सोहळ्याचे आयोजन केले. डॉ. पंजाबराव देशमुख मेमोरिअल शिक्षण संस्थेच्या कार्याध्यक्षा तथा माजी प्राचार्या राजश्रीताई मुंदाफळे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी शाळेच्या प्रांगणात हा सोहळा पार पडला. प्रारंभी महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांचा शाल, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मान केला. अनेक वर्षांनंतर शिक्षक व माजी विद्यार्थी एकत्र आल्याने जुन्या आठवणींना उजाळा मिळाला आणि भावनिक वातावरण निर्माण झाले.
विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देण्यासोबतच ज्ञान, संस्कार व शिस्तीची मूल्ये रुजविणाऱ्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा उपक्रम असल्याचे राजश्री मुंदाफळे यांनी सांगितले. माजी प्राचार्य सुरेश अरसडे यांनी विद्यार्थ्यांनी केलेला सन्मान ही आपल्या कार्याची पावती असून, विद्यार्थ्यांचे प्रेम व आदर हीच शिक्षकांची खरी कमाई असल्याचे मनोगतातून व्यक्त केले. माजी विद्यार्थीनी पल्लवी हाडके हिने स्वागतगीत सादर केले. पल्लवी चौधरी यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन सुवर्णा डहाट यांनी, तर आभार अनिता जगनाडे यांनी मानले. प्राचार्य विजय कळसाईत व शिक्षिका आरती भोरे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी संदेश साठे, निलेश सोनुळे, नितीन कोकर्डे, अमित चौरे, अपेक्षित तागडे, सिद्धार्थ वाकोडे, विशाल वाकोडे, विनोद अतकारी, रामटेके, मेश्राम यांच्यासह सर्व माजी विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. यावेळी आजी-माजी शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## जूनोना फुकेजवळ ट्रकची कारला भीषण धडक; कारचा चक्काचूर, दोघे थोडक्यात बचावले!

### 'देव तारी त्याला कोण मारी'चा प्रत्यय; ट्रक चालकासह एक जण पसार

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
जूनोना (फुके) : 'देव तारी त्याला कोण मारी' या म्हणीचा प्रत्यय देणारा भीषण अपघात शुक्रवारी (दि. ७) सायंकाळच्या सुमारास जूनोना (फुके) गावाजवळील वळणावर घडला. अनियंत्रित झालेल्या ट्रकने समोरून येणाऱ्या कारला जोरदार धडक दिल्याने कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. अपघाताची तीव्रता पाहता मोठी जीवितहानी होण्याची शक्यता होती; मात्र सुदैवाने कारमधील दोन्ही प्रवासी सुखरूप बचावल्याने मोठा अनर्थ टळला.
मिळालेल्या माहितीनुसार, हंसराज मोतीरामजी गिरडकर (४३) व नितीन टीकारामजी गिरडकर (३८), दोघेही रा. सावरगाव, हे सिंदी येथून एमएच-४० सीक्यू-७०५५ क्रमांकाच्या कारने सावरगावकडे परत जात होते. त्याचवेळी एमपी-०९ एचएच-४२१८ क्रमांकाचा ट्रक रुईच्या




गठाणी घेऊन सावरगावहून मध्यप्रदेशातील पांढुर्णाकडे जात होता.
सायंकाळी सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास जूनोना (फुके) गावाजवळील वळणावर ट्रक चालकाचे वाहनावरील नियंत्रण अचानक सुटले. भरधाव वेगातील ट्रक अनियंत्रित होऊन रस्त्याच्या विरुद्ध दिशेला जात समोरून येणाऱ्या कारवर आदळला. धडक एवढी जोरदार होती की कारच्या पुढील भागाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. वाहनाची अवस्था पाहता अपघात किती भीषण होता, याचा अंदाज येत होता.
मात्र, काळ आला होता पण वेळ आली नव्हती, अशी परिस्थिती निर्माण झाली. कारमधील हंसराज गिरडकर व नितीन गिरडकर हे दोघेही सुदैवाने गंभीर दुखापतीशिवाय बचावले. अपघाताचा मोठा आवाज होताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांनी तत्काळ मदतकार्य करून कारमधील दोन्ही प्रवाशांना बाहेर काढले.
मोठी जीवितहानी टळली
अपघातानंतर काही काळ सावरगाव-पांढुर्णा मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. रस्त्यावर अपघातग्रस्त वाहने असल्याने वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागला. नागरिकांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी मदत केली.
दरम्यान, घटनेची माहिती मिळताच संबंधित पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी अपघातस्थळाची पाहणी करून पंचनामा केला असून अपघात नेमका कोणत्या कारणामुळे घडला, याचा तपास सुरू आहे. ट्रक चालकासह त्याच्यासोबत असलेली एक व्यक्ती अपघातानंतर ट्रक सोडून पसार झाल्याची माहिती आहे. पोलिसांकडून दोघांचा शोध घेण्यात येत आहे.
या अपघातामुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली होती. कारची झालेली अवस्था पाहता दोन्ही प्रवाशांचा जीव वाचणे हा मोठा चमत्कारच मानला जात आहे. ट्रकचा वेग, चालकाचे नियंत्रण सुटण्याचे नेमके कारण तसेच रस्त्यावरील परिस्थिती याबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## राष्ट्राभिमानाचे प्रतीक असलेला तिरंगा प्रत्येक घरावर अभिमानाने फडकवूया!

### आ. सुधीर मुनगंटीवार यांचे जिल्हावासीयांना आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर (धनंजय पांढरे)**
देशगौरव पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या 'हर घर तिरंगा' अभियानाला यंदाही चंद्रपूर जिल्ह्यात अभूतपूर्व यश मिळावे, या उद्देशाने राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हाधिकारी यांना पत्र पाठविले आहे. ९ ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या अभियानासाठी एक लाख तिरंगा ध्वज उपलब्ध करून त्यांचे जिल्हाभर नियोजनबद्ध वितरण करण्यात यावे, जेणेकरून प्रत्येक घरावर अभिमानाने राष्ट्रध्वज फडकावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.
तसेच चंद्रपूर जिल्ह्याने यापूर्वीप्रमाणेच यंदाही 'हर घर तिरंगा' अभियानात राज्यात अग्रस्थानी राहून राष्ट्रभक्तीचा नवा आदर्श निर्माण करावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.
पत्रात आ. मुनगंटीवार यांनी नमूद केले आहे की, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या प्रेरणेतून सुरू झालेल्या 'हर घर तिरंगा' अभियानाला देशभर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. गेल्या



काही वर्षांपासून चंद्रपूर जिल्हा या अभियानात राज्यात अग्रस्थानी राहिला असून, यंदाही हा मान कायम राखण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच व्यापक नियोजन करणे आवश्यक आहे. यासाठी एक लाख तिरंगा ध्वज उपलब्ध करून ते नागरिकांना प्रत्येकी २५ रुपयांच्या दराने उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी, अशी सूचना त्यांनी केली आहे. तसेच ९ ते १७ ऑगस्ट या अभियान कालावधीत प्रत्येक घरापर्यंत तिरंगा पोहोचेल, यासाठी प्रभावी नियोजन व जनजागृती करण्यात यावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.
चंद्रपूर जिल्हा राष्ट्रभक्ती, जनसहभाग आणि संघटित प्रयत्नांच्या बळावर यंदाही 'हर घर तिरंगा' अभियानात राज्यात अग्रेसर राहील, असा विश्वास व्यक्त करत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सर्व जिल्हावासीयांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून ९ ते १७ ऑगस्ट या कालावधीत प्रत्येक घरावर अभिमानाने राष्ट्रध्वज फडकवून राष्ट्रप्रेमाचा उत्सव साजरा करावा, असे आवाहन केले आहे.

**थोडक्यात**

## काँग्रेस अनुसूचित जाती विभागाच्या सचिवपदी नियुक्तीबद्दल राजेश रंगारी यांचा सत्कार



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागाच्या सचिवपदी राजेश रंगारी यांची नियुक्ती झाल्याबद्दल जगदीश नगर, काटोल रोड येथील कार्यालयात त्यांचा पुष्पगुच्छ देऊन उत्साहात स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी अर्चना बडोले, नंदा बागडे, योगिता आगासे, शोभा नागुरकर, राधेश्याम राजपूत आणि माया बिसेन यांच्यावतीने राजेश रंगारी यांचा सत्कार करण्यात आला. रंगारी यांच्यावर पक्षाने सोपविलेल्या नवीन जबाबदारीबद्दल उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.
तसेच अनुसूचित जाती समाजासह वंचित व दुर्बल घटकांच्या विविध प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांसाठी सातत्याने कार्य करण्यासाठी त्यांच्या अनुभवाचा व नेतृत्वाचा लाभ होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. नवीन जबाबदारीच्या माध्यमातून सामाजिक न्याय, समता आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## हज्जियानी खातिजाबाई गर्ल्स हायस्कूल, कामठी येथे सायबर हायजीन व सायबर एथिक्स जनजागृती कार्यशाळेचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
एडुसन फाउंडेशनतर्फे नागपूर पोलिसांच्या सायबर सेलच्या सहकार्याने शुक्रवारी, ७ ऑगस्ट रोजी हज्जियानी खातिजा बाई गर्ल्स हायस्कूल, कामठी येथे विद्यार्थिनींसाठी सायबर हायजीन व सायबर एथिक्स जनजागृती कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या जनजागृती कार्यक्रमात इयत्ता ९ वी व १० वीच्या ४१२ विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थिनींना सायबर हायजीन, सायबर एथिक्स, ऑनलाइन सुरक्षितता, सायबर सुरक्षा, सायबर गुन्ह्यांना प्रतिबंध, डिजिटल तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर तसेच जबाबदार डिजिटल नागरिकत्व याबाबत जागरूक करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या आचल चित्तारे (सायबर सेल, नागपूर पोलीस) होत्या. त्यांनी विद्यार्थिनींना विविध प्रकारचे सायबर फ्रॉड, डिजिटल फसवणूक, ऑनलाइन धोके, टास्क फ्रॉड तसेच सोशल मीडिया, मोबाईल अप्लिकेशन्स आणि इतर डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर करताना घ्यावयाच्या आवश्यक खबरदारीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सुरक्षित ऑनलाइन वर्तन अंगीकारण्यासोबतच कोणत्याही प्रकारच्या सायबर गुन्ह्याला सामोरे जावे लागल्यास संबंधित माध्यमांद्वारे तातडीने तक्रार नोंदविण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाला संबोधित करताना एडुसन फाउंडेशनचे कार्यक्रम समन्वयक निलेश काळे यांनी सध्याच्या डिजिटल युगात सायबर जागरूकतेची वाढती गरज अधोरेखित केली. त्यांनी सांगितले की, डिजिटल साक्षरता, सायबर हायजीन आणि जबाबदार ऑनलाइन वर्तन ही आज प्रत्येक विद्यार्थ्यासाठी आवश्यक जीवनकौशल्ये आहेत.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्या रफिया शहनाज होत्या. त्यांनी विद्यार्थिनींना कार्यशाळेत मिळालेल्या ज्ञानाचा आपल्या दैनंदिन डिजिटल जीवनात उपयोग करण्याचे तसेच जबाबदार आणि जागरूक डिजिटल नागरिक बनण्याचे आवाहन केले. यावेळी कामठी पोलिसांचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक योगेश नाल्दे यांचीही उपस्थिती होती. त्यांच्या उपस्थितीमुळे विद्यालयीन विद्यार्थिनींमध्ये सायबर सुरक्षा जागरूकता वाढविण्यासाठी स्थानिक पोलिसांची बांधिलकी अधोरेखित झाली. कार्यक्रमाचे संचालन माहेर निगार यांनी केले. याप्रसंगी मंचावर सामाजिक कार्यकर्त्या व प्राध्यापिका इशरत खान, इशरत अंजुम तसेच ज्येष्ठ शिक्षिका अंजुम अफरोज यांचीही उपस्थिती होती.

## दीर्घ शासकीय सेवेनंतर विठ्ठल काळबांडे यांना सेवानिवृत्ती निरोप




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
संताजी जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, श्रद्धानंद पेठ, नागपूर येथील शिल्पनिदेशक विठ्ठल नामदेवराव काळबांडे हे प्रदीर्घ शासकीय सेवा बजावल्यानंतर नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवापूर्तीनिमित्त नागपूर आय.टी.आय. स्टाफ क्लब असोसिएशनच्यावतीने निरोप व सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या उपसंचालिका कुलकर्णी होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी संघटनेचे नेते अशोक दगडे तसेच कास्ट्राईब कर्मचारी संघटनेचे नेते शामरावजी हाडके उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सेवानिवृत्त विठ्ठल काळबांडे यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात बजावलेल्या कर्तव्याचा, कार्यनिष्ठेचा आणि संस्थेच्या प्रगतीसाठी दिलेल्या योगदानाचा गौरव केला. त्यांच्या सेवाभावी कार्याची प्रशंसा करून पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.
संस्थेच्या उपसंचालिका कुलकर्णी यांच्या शुभहस्ते शाल व श्रीफळ देऊन काळबांडे यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना काळबांडे यांनी आपल्या सेवाकाळातील विविध अनुभवांना उजाळा देत संस्था, सहकारी अधिकारी व कर्मचारी तसेच आपल्या परिवारातील सदस्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. प्रदीर्घ सेवाकाळात कुटुंबीयांनी केलेल्या सहकार्यामुळे आपला प्रवास अधिक सुकर झाला, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्टाफ क्लब असोसिएशनच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. संस्थेतील अधिकारी, कर्मचारी तसेच सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिमाखदार नियोजनात झालेल्या या निरोप व सत्कार समारंभाची सांगता चहा-नाश्त्याने झाली.

थोडक्यात

## हर घर तिरंगा अभियान अंतर्गत आज तिरंगा रॅली

### नागरिकांनी मोठ्या संख्येत सहभागी होण्याचे महापौरांचे आवाहन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकातर्फे हर घर तिरंगा अभियान अंतर्गत रविवारी ९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता बाजीप्रभू चौक, रामनगर ते स्वातंत्रवीर सावरकर चौक पर्यंत मोठी तिरंगा रॅली काढण्यात येणार आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत केंद्र शासनाकडून सन २०२२ पासून "हर घर तिरंगा" ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. लोकांच्या हृदयात देशभक्तीची भावना जागृत करणे तसेच भारतीय राष्ट्रध्वजाबद्दल जागरूकता वाढवणे, या सदर उपक्रम राबविण्यामागील मूळ कल्पना आहे. रविवार ९ ऑगस्टपासून या देशभक्ती अभियानाची सुरुवात होणार आहे. याची माहिती महापौर निता ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत शनिवारी दिली. कविवर्य सुरेश भट सभागृह परिसरात आयोजित पत्रकार परिषदेत सत्ता पक्ष नेते नरेंद्र (बाल्या ) बोरकर, माजी महापौर दयाशंकर तिवारी, मनपाचे अतिरिक्त आयुक्त मुरुगनाथम एम.,मुख्यमंत्री सचिवालयच्या उपसचिव आशा पठाण आणि समाज विकास विभागाच्या उपायुक्त डॉ रंजना लाडे उपस्थित होते.

महापौर निता ठाकरे यांनी सांगितले की, तिरंगा रॅलीमध्ये मनपाशाळेतील विद्यार्थीच्या सांस्कृतिक पथक सोबत राहणार आहे. तसेच शीख बांधव पारंपरिक वेष भुषेत राहणार आहे. या रॅली मध्ये माजी सैनिक सुद्धा मोठ्या संख्येने सहभागी होणार आहे. विशेष म्हणजे, ७०० मीटर लांब तिरंगा ध्वज हा या रॅलीचा मुख्य आकर्षण राहणार असून, यामध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येत भाग घ्यावे असे आवाहन महापौरांनी केले आहे. मनपाद्वारे शहरात १ लाख ७५ हजार तिरंगा झेंड्यांचे वाटप करणार आहे, असे सांगत महापौरांनी प्रत्येक नागरिकांना आपल्या घरी तिरंगा ध्वज लावावा असे आवाहन ही त्यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा उपस्थितीत १० ऑगस्ट रोजी सकाळी तिरंगा वंदे मातरम प्रदर्शनीचा उद्घाटन कविवर्य सुरेश भट सुरेश भट येथे करण्यात येणार आहे. तिथे मोठ्या आकाराची तिरंगा रांगोळी सुद्धा काढण्यात येणार आहे. भारताच्या फाळणीच्या भयावहता स्मृती दिनानिमित्त कार्यक्रम १४ ऑगस्ट रोजी दयानंद पार्क जरीपटका येथे सायंकाळी ७.३० वाजता आयोजित करण्यात येणार आहे. वंदे मातरम् वर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम १३ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता चिटणीस पार्कमध्ये आयोजित करण्यात येणार आहे. तसेच तिरंगा सांस्कृतिक कार्यक्रम १५ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता कविवर्य सुरेश भट सभागृह येथे आयोजित केले गेले आहे. महापौरांनी पुढे सांगितले की, सन २०२६ मध्ये हर घर तिरंगा मोहीम केंद्र शासनाच्या सुचनेप्रमाणे रविवार ९ ऑगस्ट पासून राबविण्याचे निर्देश राज्य शासनामार्फत करण्यात आले आहे. मोहिमेच्या अंमलबजावणी करण्याकरिता केंद्र व राज्य शासनाने निर्गमित मार्गदर्शक सुचनांचे पालन करून शहराकरीता तिरंगे झेंडे वाटप करणार आहे. त्यात मनपा शाळा विद्यार्थी आर्थिक दुर्बल भागात झेंडेच्या वाटप करणार आहे. या प्रसंगी सहायक आयुक्त नरेंद्र बावनकर, क्रीडा अधिकारी डॉ. पियुष अंबुलकर आणि इतर उपस्थित होते.

## दहेगाव - कामठी रोडवर खड्डे देत आहेत अपघाताला निमंत्रण

### एनएच-२४७ वरील दुरवस्थेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष, १५ दिवसांत दुरुस्ती न झाल्यास आंदोलनाचा इशारा





**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

दहेगाव ते कामठी मार्गावरील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक एनएच-२४७ वर चनकापूर येथील मिलन चौकाजवळ रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली असून, ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. या गंभीर समस्येकडे संबंधित विभागाचे तातडीने लक्ष वेधण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.मिलन चौक परिसरातून दररोज मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. मात्र रस्त्यावर निर्माण झालेले खड्डे वाहनचालकांसाठी धोकादायक ठरत आहेत. विशेषतः दुचाकीस्वारांना खड्डे चुकविताना अपघात होण्याची शक्यता असून, रात्रीच्या वेळी परिस्थिती अधिक गंभीर बनते. पावसाचे पाणी खड्डूयांमध्ये साचल्याने त्यांची खोली लक्षात येत नसल्याने अपघाताचा धोका आणखी वाढला आहे.या रस्त्याची तातडीने दुरुस्ती न झाल्यास भविष्यात अपघात होऊन जीवित अथवा मालमत्तेची हानी झाल्यास त्याची जबाबदारी रस्त्याच्या देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी असलेल्या संबंधित विभागावर निश्चित करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, या समस्येबाबत खापरखेडा पोलिस ठाण्याच्या पोलिस निरीक्षक हरीष रूमकर याना लेखी निवेदन देऊन पूर्वसूचना देण्यात आली आहे. रस्त्याची येत्या १५ दिवसांत दुरुस्ती न झाल्यास जनहितासाठी कायद्याच्या चौकटीत शांततामय व लोकशाही मागार्ने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा माजी उपसभापती राहुल तिवारी यांनी निवेदनातून दिला आहे.रस्त्याच्या दुरवस्थेमुळे कोणताही अनुचित प्रकार घडण्यापूर्वी संबंधित यंत्रणेने तातडीने पाहणी करून खड्डे बुजवावेत आणि वाहतूक सुरक्षित करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

**माजी उपसभापती :- राहुल तिवारी**

दहेगाव - कामठी रोडवर मिलन चौकाजवळील खड्डूयांमुळे वाहनचालकांचा जीव धोक्यात आला आहे. प्रशासनाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती करावी. १५ दिवसांत दुरुस्ती न झाल्यास नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी शांततामय आंदोलन करण्यात येईल.

# एकाच नंबर प्लेट व ई-टीपीचा वापर करून अवैध रेती वाहतूक

### १.८१ कोटींचा मुद्देमाल जप्त, रामनगर, स्थानिक गुन्हे शाखा व भद्रावती पोलिसांची संयुक्त धडक कारवाई , तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर (धनंजय पांढरे)**



पोलीसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखा, रामनगर पोलीस आणि भद्रावती पोलिसांनी संयुक्तरित्या केलेल्या धडक कारवाईत एकाच नोंदणी क्रमांकाची (नंबर प्लेट) आणि एकाच ई-टीपीचा वापर करून शासनाची फसवणूक करत अवैध रेती वाहतूक करणाऱ्या टोळीचा पदार्फाश केला. या कारवाईत सुमारे १ कोटी ८१ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, तीन आरोपींविरुद्ध विविध कायद्यांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, ७ ऑगस्ट २०२६ रोजी मध्यरात्रीनंतर रामनगर पोलिसांना मूल-चंद्रपूर मार्गावर दोन जड वाहनांद्वारे एकाच नंबर प्लेटचा वापर करून अवैध रेती वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस निरीक्षक प्रभावती एकुरके यांच्या नेतृत्वाखाली नागपूर मार्गावरील वाहतूक शाखेजवळ नाकाबंदी करण्यात आली. दरम्यान, रात्री सुमारे ३ वाजता एमएच-३४-बीझेड-८११४ क्रमांकाची १२ चाकी हायवा संशयास्पदरीत्या येताना दिसली. पोलिसांनी थांबविण्याचा प्रयत्न केला असता चालकाने वाहन भरधाव वेगाने नागपूरच्या दिशेने पळवले. पोलिसांनी पाठलाग करून भद्रावती पोलिसांच्या मदतीने घोडपेठ परिसरात वाहन ताब्यात घेतले.

यानंतर सुमारे ३.३० वाजता त्याच क्रमांकाची एमएच-३४-बीझेड-८११४ असलेली दुसरी १६ चाकी टाटा ट्रक नाकाबंदीत अडविण्यात आली. दोन्ही वाहनांची तपासणी केली असता दोन्ही स्वतंत्र वाहनांवर एकच नंबर प्लेट लावलेली असल्याचे उघड झाले. तसेच दोन्ही चालकांनी ३३१९८३४७ या एकाच ई-टीपी क्रमांकाचा वापर करून रेतीची वाहतूक केल्याचेही निष्पन्न झाले.

या कारवाईत टाटा ४८३० टी.के. १६ चाकी किंमत सुमारे ४५ लाख रुपये, टाटा ३५३२ टी.के. १२ चाकी हायवा किंमत ३५ लाख रुपये, तसेच दोन्ही वाहनांमधील प्रत्येकी ११ ब्रास रेती असा एकूण १ कोटी ८१ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी स्वप्निल सुरेश कबडे (३७), रा. सावजी नगर, वर्धा, रामकेश राजेश केवट (२०), रा. सीधी, मध्य प्रदेश) हे चालक तसेच रोहन चाफले रा. खांबाळा, ता. वरोरा या वाहन मालकाविरुद्ध रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपींनी संगनमत करून शासनाचा महसूल बुडविण्याच्या उद्देशाने बनावट ई-टीपी आणि एकाच नंबर प्लेटचा वापर केल्याप्रकरणी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ मधील कलम ३०३(२), ३१८(४), ३३६(३), ३(५), महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ४८(७), ४८(८) तसेच खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम १९५७ आणि पर्यावरण संरक्षण कायद्यातील संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास रामनगर पोलीस करीत आहेत.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपानी व अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद चौघुले यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे आणि रामनगर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक प्रभावती एकुरके यांच्या नेतृत्वात सपोनि विरेंद्र केदारे, पो.उपनि. सर्वेश बेलसरे, पो.हवा. विनोद यादव, पो. हवा. गणेश भोयर, पो. हवा. जितेंद्र आकारे, पो. हवा. अनुप आष्टुंकर, पो. हवा. गोपाल आतकुलवार, पो.अं. अजित शेंडे, पो.अं. प्रकाश मडावी, पो.अं. राजू चिताडे यांनी केली.

## शिक्षणक्रांतीच्या विचारांना महाज्योतीची आधुनिक दिशा : शैल जैमिनी




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

### महाज्योतीचा सातवा वर्धापन दिन उत्साहात

शिक्षण हे केवळ ज्ञान मिळविण्याचे साधन नसून समाजाच्या परिवर्तनाची सर्वांत प्रभावी शक्ती आहे. क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाची दारे सर्वसामान्यांसाठी खुली करून महाराष्ट्राच्या नव्हे, तर भारताच्या सामाजिक परिवर्तनाची पायाभरणी केली. त्यांच्या विचारांना आजच्या काळातील गरजांशी जोडत बहुजन समाजातील युवक-युवतींना शिक्षण, प्रशिक्षण आणि संधी देण्याचे कार्य महाज्योती करीत आहे. त्यामुळे फुले दाम्पत्याने पेटविलेल्या शिक्षणक्रांतीची आधुनिक वाटचाल म्हणजे महाज्योती असल्याचे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या तथा ज्येष्ठ नाट्यकलावंत शैल जैमिनी कडू यांनी केले.

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था, नागपूर (महाज्योती)चा सातवा वर्धापन दिन शनिवारी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी त्या उद्घाटनीय भाषणात बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे होते. प्रमुख अतिथी म्हणून गोवारी समाज अंमलबजावणी व संनियंत्रण समितीचे अध्यक्ष तथा राज्यमंत्री दर्जा कैलाश राऊत, महाज्योतीचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा वनाटीर्चे प्रभारी व्यवस्थापकीय संचालक मा. प्रशांत वावगे, तसेच महाज्योतीच्या सहायक लेखा अधिकारी वर्षा अहिर उपस्थित होत्या.

तत्पूर्वी मान्यवरांच्या हस्ते क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. पुढे बोलतांना शैल जैमिनी कडू म्हणाल्या, फुले दाम्पत्याने ज्या काळात शिक्षणाचा अधिकार समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी संघर्ष केला, त्या संघषार्चा केंद्रबिंदू केवळ शाळा सुरू करणे नव्हता, तर माणसाला विचार करण्याची आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्याची ताकद देणे हा होता. आजच्या काळात त्याच विचारांना कौशल्य प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षा, संशोधन आणि रोजगाराच्या संधींची जोड देणे आवश्यक आहे. महाज्योती हे काम संस्थात्मक पातळीवर पुढे नेत असून, विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत असल्याचेही शैल जैमिनी कडू यांनी नमूद केले. यानंतर उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन करताना महाज्योतीच्या कायार्चा गौरव केला. तसेच संस्थेच्या माध्यमातून बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण, प्रशिक्षण आणि प्रगतीच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमांना शुभेच्छा दिल्या.

**शब्द, रंग अन् बुद्धीची रंगली मैफल**

महाज्योतीच्या सातव्या वर्धापन दिनानिमित्त अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी विविध सांस्कृतिक व बौद्धिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या साहित्य व विचारांवर आधारित वक्तृत्व स्पर्धेत सहभागी कर्मचाऱ्यांनी शिक्षण, समता, स्त्रीशिक्षण आणि समाजपरिवर्तनाचे विचार प्रभावीपणे मांडले. रांगोळी स्पर्धेत सामाजिक संदेशांना कलात्मक अभिव्यक्ती मिळाली, तर बुद्धिबळ स्पर्धेत डावपेच आणि बुद्धीची चुरस रंगली. एक मिनिटांच्या मनोरंजक खेळांनी कार्यक्रमात उत्साहाची भर पडली. विविध स्पर्धांतील विजेत्यांसह वर्षभर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिला व पुरुष कर्मचाऱ्यांचा सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकल्प अधिकारी धम्मा गजभिये यांनी केले तर चैताली खडतकर यांनी आभार मानले.

## आज विदर्भस्तरीय खंजरी भजन स्पर्धेची महाअंतिम फेरी

### केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांच्या हस्ते होणार बक्षीस वितरण, पद्मश्री जनार्दनपंत बोथे गुरुजी यांची विशेष उपस्थिती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीतर्फे वंदनीय





राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या भजनावर आधारित विदर्भस्तरीय खंजरी भजन स्पर्धेची महाअंतिम फेरी रविवार, ९ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग येथे रंगणार आहे. विदर्भातील स्पर्धकांचा उत्सा बघता प्राथमिक फेरीतून २५ उत्तम मंडळांची निवड झालेली असून १७ विजेत्या मंडळांना सायंकाळी ६ वाजता बक्षीस वितरण केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांच्या शुभहस्ते विजेत्या भजनी मंडळांना रोख पारितोषिके, गौरवचिन्हे प्रदान करण्यात येतील.

याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून पद्मश्री जनार्दनपंत बोथे गुरुजी उपस्थित राहतील. तसेच महापौर नीता ठाकरे,उपमहापौर लीला हाथीबेड, राज्यसभा खासदार मायाताई इवनाते, भाजपा शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी, सर्व आमदार संजय भेंडे, आ.कृष्णा खोपडे, आ.मोहन मते, आ.प्रवीण दटके, आ.परिणय फुके, आ.डॉ. राजीव पोतदार, आ.अरुण लखानी, आ.आशिष देशमुख, आ.समीर मेघे, आ.चरणसिंग ठाकूर ,तसेच, स्थायी समिती अध्यक्ष शिवानी दाणी, सत्तापक्ष नेते नरेंद्र बोरकर, अशोक यावले, राजेश कुंभलकर, ज्ञानेश्वर रक्षक,जयप्रकाशजी गुप्ता, हेमंतजी काळमेघ यांची उपस्थिती राहणार आहे. स्पर्धेतील प्रथम विजेत्या मंडळाला ५१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकाला ३१ हजार, तृतीय क्रमांकाला २५ हजार, चतुर्थ क्रमांकाला २१ हजार, पाचव्या क्रमांकाला १५ हजार, सहाव्या क्रमांकाला ११ हजार, तर सातव्या क्रमांकावरील मंडळाला ७ हजार रुपये रोख पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. याशिवाय प्रत्येकी ५ हजार रुपयांचे दहा उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात येतील. महाअंतिम फेरी आणि पारितोषिक वितरण सोहळ्याला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भजनी मंडळांचा उत्साह वाढवावा, असे आवाहन खासदार सांस्कृतिक महोत्सव समिती द्वारे केले आहे.

## आमदारांच्या वाढदिवसानिमित्त आमगावमध्ये विविध समाजोपयोगी उपक्रम; रक्तदान, वृक्षारोपण व दिव्यांगांना तीन चाकी सायकल वाटप

**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**



आमदार संजय पुराम यांच्या वाढदिवसानिमित्त काल चिरचाळबांध येथे आरोग्य उपकेंद्राचे लोकार्पण, रोगनिदान शिबिर आणि विविध विकासकामांच्या घोषणेनंतर आज आमगाव येथील डी. फार्म. फार्मसी कॉलेज परिसरात विविध सामाजिक व लोकहिताचे उपक्रम पार पडले. कार्यक्रमांतर्गत आयोजित रक्तदान शिबिरात सुमारे २०० युवकांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. या रक्तसंकलनामुळे गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही मोफत रोगनिदान शिबिर, चष्मा वाटप तसेच हृदयविकार, कर्करोग, किडनी आणि यकृताच्या आजारांवरील मोफत उपचारांसाठी विशेष वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. हे उपक्रम शालिनीताई मेघे यांच्या सहकायार्ने राबविण्यात आले.

यावेळी 'सविता पुराम बिर्सा फाऊंडेशन' व 'सवितापुराम मित्र परिवार' यांच्या वतीने गरजू दिव्यांग नागरिकांना तीन चाकी सायकलींचे वाटप करण्यात आले. दुसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून आल्यानंतर दिव्यांगांच्या सेवेसाठी घेतलेला संकल्प सातत्याने पूर्ण केला जात असल्याचे आमदार पुराम यांनी सांगितले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी डी. फार्म. फार्मसी कॉलेज परिसरात विविध प्रजातींच्या वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. तसेच आमगाव येथील किडंगीपार गोशाळेसाठी गोमातेला आपल्या वजनाइतका चारा अर्पण करून गोसंवर्धनासाठीही मदतीचा हात पुढे करण्यात आला.

यावेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना आमदार संजय पुराम यांनी सांगितले की, वाढदिवस हा केवळ शुभेच्छा स्वीकारण्याचा दिवस नसून समाजासाठी काहीतरी विधायक करण्याची संधी आहे. त्यामुळे दरवर्षी विविध सामाजिक, आरोग्यविषयक आणि जनकल्याणकारी उपक्रम राबविण्याचा प्रयत्न केला जात आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा गोंदिया जिल्हाध्यक्ष सिताताई रहांगडाले होत्या, तर उद्घाटक म्हणून भाजपा भंडारा-गोंदिया संघटन मंत्री विरेंद्र अंजनकर उपस्थित होते.

यावेळी माजी आमदार केशवराव मानकर, माजी आमदार भैरसिंग नागपुरे, माजी जिल्हाध्यक्ष येशुलाल उपराडे, पंकज रहांगडाले, नरेंद्र वाजपेई, अनिल जोशी, योगिता पुंडे, सुनंदाताई उके, शालिकराम गुरनुले, अनिल बिसेन, संदिप भाटिया, किशोर महारवाडे, हनवंतराव वट्टी, कल्पनाताई वालोदे, संजुभाऊ उईके, प्रज्ञाताई संगीडवार, रितेश अग्रवाल, पिंकीताई कटकवार, नुतनताई सयाम, महेश जैन, नितिन मेश्राम, सिताबाई रंगारी, कौशल्याबाई कुंभरे, शकील कुरेशी, कमलबाई मेश्राम, संदिप डेकाटे, अजयकुमार डोये, आफताब (अन्नुभैय्या) शेख, संजय दरवडे, तनुजाताई भेलावे, सुनिताताई उईके, प्रतिभाताई शिवणकर, डॉ. राजेंद्र बडोले, प्रेरणाताई बंडीवार, किशोर गावराने, अर्चनाताई मडावी, गुमानसिंग उपराडे, अंबिकाताई बंजार, वैशालीताई पंधरे, शामकलाताई गावड, ममताताई अंबादे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

थोडक्यात

## अज्ञात वाहनाच्या धडकेत ८१ वर्षीय इसमाचा मृत्यू

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

पोलीस स्टेशन सावनेर हद्दीत येणाऱ्या बोरुजवाडा शिवारातील एचपी पेट्रोल पंपाजवळ पहाटे सुमारे ३.३० वाजताच्या दरम्यान अज्ञात वाहनाच्या धडकेत पायदळ जाणारे ८१ वर्षीय इसम गंभीर जखमी झाले. याबाबत सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांना माहिती मिळताच त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमी इसमाला उपचारासाठी सावनेर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी नागपूर येथे नेत असताना वाटेतच त्यांचा मृत्यू झाला.

मृतकाची ओळख दयाराम संपत सोनटक्के (वय ८१), रा. खुरजगाव, ता. सावनेर, जि. नागपूर अशी झाली आहे. मृतदेह सावनेर शासकीय रुग्णालयात आणल्यानंतर डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी रवाना करण्यात आला. दरम्यान, अपघातास कारणीभूत ठरलेल्या अज्ञात वाहनाचा शोध सावनेर पोलीस घेत असून पुढील तपास सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पीएसआय उमेश मेश्राम करीत आहेत.

## प्रतिबंधित सुगंधित तंबाखूची वाहतूक, ४.०1 लाखांचा मुद्देमाल जप्त

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या सुगंधित तंबाखूची अवैध वाहतूक करणाऱ्या एका व्यक्तीविरुद्ध पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत ६०० ग्रॅम सुगंधित तंबाखूसह चारचाकी टाटा एस वाहन असा एकूण ४ लाख १ हजार २७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. शुक्रवारी (दि.७) पोलीस गस्तीवर असताना त्यांना प्रतिबंधित सुगंधित तंबाखूची वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून टाटा एस (क्र. एमएच ३६/एफ २२२०) वाहनाची पंचांसमक्ष झडती घेतली. यावेळी वाहनातून ६०० ग्रॅम प्रतिबंधित सुगंधित तंबाखू आढळून आला. त्याची किंमत १ हजार २७५ रुपये असून, चारचाकी वाहनाची किंमत चार लाख रुपये आहे.

या प्रकरणी कमालुद्दीन करीमुद्दीन सैयद (४४, रा. छोटा मस्जिदजवळ, गौतम नगर वॉर्ड, पवनी, जि. भंडारा) याच्याविरुद्ध पोलीसांनी विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के आणि सहायक पोलीस अधीक्षक तथा उमरेड विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी मयंक माधव यांच्या मार्गदर्शनाखाली भिवापूर पोलिसांनी पार पाडली.

## पारवे महाविद्यालयात विद्यार्थ्यांना सायकल वाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने पारवे महाविद्यालय आणि रोटरी क्लब नागपूर हॅलोजन यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (८ ऑगस्ट) सायकल वितरण सोहळा आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव राजू पारवे होते. प्रमुख पाहुण्या म्हणून संस्थेच्या सहसचिव दीपिका पारवे उपस्थित होत्या. यावेळी रोटरी संस्थेचे अध्यक्ष मधुकर मेश्राम, डॉ. प्रफुल्ल मोकादम, विवेक गर्गे, विजय अंबुलकर, सुधीर थोते, आशिष बोडके, नगराध्यक्ष सुषमा श्रीरामे तसेच नगरसेवक रमेश भजभुजे उपस्थित होते.

यावेळी राजू पारवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत सायकल मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांत प्रगती साधावी, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. वैशाली राऊत यांनी केले, तर पूनम गोंडी-मेश्राम यांनी आभार मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारीवर्गासह विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' अभियानांतर्गत जिल्हास्तरीय स्पर्धांचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

'मेरा युवा भारत', नागपूर युवा कार्यक्रम तसेच केंद्रीय युवा कार्य व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्यावतीने 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' अभियानांतर्गत ६ ऑगस्ट रोजी बिंझानी नगर महाविद्यालयात जिल्हास्तरीय विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. सोपानदेव पिसे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रत्येक महाविद्यालयात युवकांसाठी नशामुक्तीविषयक उपक्रम राबविण्यात यावेत, असे आवाहन डॉ. पिसे यांनी यावेळी केले. 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' अभियानांतर्गत पुढील दोन वर्षांत नागपूर विद्यापीठाशी संलग्न प्रत्येक महाविद्यालयात दर रविवारी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. या उपक्रमांतर्गत चित्रकला, वादविवाद, नृत्य, संगीत, लोकगीत, पथनाट्य, कविता, लघुपट तसेच घोषवाक्य लेखन आदी स्पर्धा घेण्यात आल्या.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुजित मेत्रे अध्यक्षस्थानी होते. विशेष अतिथी म्हणून 'मेरा युवा भारत'चे माजी उपनिदेशक शरद साळुंके आणि धनवटे नॅशनल कॉलेजचे डॉ. नितीन कराळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक 'मेरा युवा भारत'चे उपनिदेशक सौरभकुमार निषाद यांनी केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. सुजित मेत्रे यांनी युवकांनी नशेपासून दूर राहून व्यसनमुक्त भारत घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावावी, असे आवाहन केले.

# पीक विम्यात पिकांची अदलाबदल, शेतकऱ्यांच्या खात्यातून परस्पर रक्कम कपात!

*नरखेडच्या बँक ऑफ महाराष्ट्र शाखेत गंभीर प्रकाराचा शेतकरी संघटनेचा आरोप; चुकीचा विमा काढल्याने शेतकरी अडचणीत, १७ ऑगस्टपर्यंत कारवाई न झाल्यास आंदोलन*

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीपासून आर्थिक संरक्षण मिळावे, यासाठी केंद्र शासनाकडून प्रधानमंत्री फसल बीमा योजना राबविण्यात येते. मात्र याच पीक विमा योजनेत नरखेड येथील बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखेत गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप शेतकरी संघटनेने केला आहे. शेतकऱ्यांची परवानगी न घेता त्यांच्या खात्यातून विम्याची रक्कम कपात करण्यात आली असून, प्रत्यक्ष शेतात असलेल्या पिकाऐवजी दुसऱ्याच पिकाचा विमा काढण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकारामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण असून, प्रकरणाची तातडीने चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.



शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सागर दुधाने यांनी दिलेल्या माहितीनुसार, नरखेड शाखेत काही शेतकऱ्यांच्या खात्यातून पीक विम्याची रक्कम परस्पर वळती करण्यात आली. विशेष म्हणजे ज्या शेतकऱ्यांच्या शेतात सोयाबीन पीक आहे, त्यांच्या विमा नोंदीमध्ये कपाशीचा उल्लेख करण्यात आल्याचा आरोप आहे. तर काही कपाशी उत्पादक शेतकऱ्यांच्या नावावर इतर पिकाचा विमा काढण्यात आल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

**प्रत्यक्ष पीक वेगळे, विमा नोंद वेगळी!**

शेतकऱ्याच्या शेतात कोणते पीक आहे, त्यानुसार विमा संरक्षण मिळणे अपेक्षित असताना विमा प्रस्तावातच चुकीच्या पिकाची नोंद झाली असल्यास भविष्यात नुकसान भरपाईच्या वेळी मोठी अडचण निर्माण होऊ शकते. पिकाचे नुकसान झाल्यानंतर विमा कंपनीकडून नोंदीची पडताळणी केली जाते. त्यावेळी प्रत्यक्ष पीक आणि विमा प्रस्तावातील पीक वेगळे आढळल्यास नुकसान भरपाईचा दावा अडचणीत येण्याची शक्यता आहे. यामुळे बँकेकडून झालेल्या कथित चुकीचा फटका शेतकऱ्यांना बसू नये, अशी मागणी शेतकरी संघटनेने केली आहे.

**शेतकऱ्यांची परवानगी घेतली का?**

पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यातून कशाच्या आधारे वळती करण्यात आली? संबंधित शेतकऱ्यांची संमती घेण्यात आली होती का? विमा प्रस्तावामध्ये पिकाची माहिती कोणी भरली? चुकीच्या पिकाची नोंद कशी झाली? तसेच विमा कंपनीकडे कोणती माहिती पाठविण्यात आली? या प्रश्नांची उत्तरे बँक प्रशासनाने द्यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

**जाब विचारण्यासाठी गेले; मात्र व्यवस्थापक अनुपस्थित**

या कथित प्रकाराची माहिती घेण्यासाठी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सागर दुधाने बँक ऑफ महाराष्ट्रच्या नरखेड शाखेत गेले होते. मात्र त्यावेळी शाखा व्यवस्थापक उपस्थित नसल्याचे सांगण्यात आले. इतर कर्मचाऱ्यांकडे विचारणा केली असता, आम्ही नवीन आहोत, आम्हाला माहिती नाही, अशी उत्तरे मिळाल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

सर्व विमा नोंदींची तपासणी करा

नरखेड तालुक्यातील संबंधित बँक शाखेतून PMFBY अंतर्गत विमा काढलेल्या शेतकऱ्यांची संपूर्ण यादी तपासण्यात यावी. प्रत्येक शेतकऱ्याच्या प्रत्यक्ष पिकाची नोंद, विमा प्रस्ताव, विमा हप्ता, क्षेत्रफळ आणि विमा कंपनीकडे पाठविण्यात आलेली माहिती यांची पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**दोष बँकेचा असेल तर शिक्षा शेतकऱ्यांना का?**

पीक विम्याच्या नोंदीमध्ये चुकीचे पीक दाखविले गेल्यास भविष्यात शेतकऱ्यांच्या दाव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी चुकीची माहिती दिली नसतानाही त्यांच्यावर कोणतीही कारवाई होऊ नये. त्यांच्या विमा दाव्यावर परिणाम होऊ नये, यासाठी शासन आणि संबंधित विमा कंपनीने स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

**शेतकरी संघटनेच्या चार प्रमुख मागण्या**

या प्रकरणाची बँक ऑफ महाराष्ट्रच्या वरिष्ठ प्रशासनाने तातडीने चौकशी करून दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी. चुकीच्या पद्धतीने काढण्यात आलेले विमे रद्द करून शेतकऱ्यांच्या खात्यातून कापलेली रक्कम परत करावी.

# सालेकसा आयटीआयमध्ये जुन्याच आवारभिंतीला नव्या बांधकामाचा मुलामा

**लाखो रुपयांच्या कामावर प्रश्नचिन्ह, शासकीय निधीच्या वापराबाबत गंभीर संशय, ठेकेदार व अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करण्याची मागणी**

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा - प्रकाश टेंभरे**

आदिवासी तसेच इतर विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख तांत्रिक शिक्षण मिळावे, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास विभागामार्फत तालुकास्तरावर औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यात आल्या आहेत. मात्र, गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा येथील औद्योगिक प्रशिक्षण केंद्रातील सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेल्या बांधकाम कामावरून आता गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.



सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून या कामासाठी शासनाकडून लाखो रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, प्रत्यक्षात जुन्याच आवारभिंतीला नवीन बांधकाम म्हणून दाखवून शासकीय निधीचा वापर करण्यात आल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. विशेष म्हणजे, संबंधित कामाचे अंदाजपत्रक, प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी, कार्यादेश, मोजमाप पुस्तिका (एम.बी.), कामाची प्रत्यक्ष स्थिती तसेच कंत्राटदाराला करण्यात आलेले देयक यांची सखोल तपासणी केल्यास या कामाचे वास्तव समोर येऊ शकते. जुने बांधकाम आणि नवीन बांधकाम यातील फरक नेमका काय, कामासाठी किती निधी मंजूर झाला आणि प्रत्यक्षात किती काम झाले, याची माहिती सार्वजनिक होणे गरजेचे आहे.

या प्रकरणात संबंधित अधिकारी, कळक मधील काही कर्मचारी आणि कंत्राटदार यांच्यात संगनमत झाले असल्याच्या चर्चाही परिसरात सुरू आहेत. मात्र, या चर्चांमध्ये कितपत तथ्य आहे, हे अधिकृत चौकशीनंतरच स्पष्ट होणार आहे. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीवर आरोप निश्चित करण्याआधी संबंधित कागदपत्रे व प्रत्यक्ष कामाची तांत्रिक पाहणी करणे आवश्यक आहे.

आयटीआय ही विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी निगडित संस्था आहे. अशा संस्थांसाठी शासनाकडून उपलब्ध होणारा निधी विद्यार्थ्यांना दर्जेदार सुविधा, प्रशिक्षणाची साधने, सुरक्षित इमारत आणि आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी खर्च होणे अपेक्षित आहे. जर जुन्या बांधकामालाच नवीन काम दाखवून निधी खर्च करण्यात आला असेल, तर हा प्रकार केवळ आर्थिक अनियमिततेपुरता मर्यादित न राहता शासनाच्या निधीच्या वापराबाबत गंभीर प्रश्न निर्माण करणारा ठरू शकतो.

त्यामुळे सालेकसा आयटीआय मधील सन २०२४-२५ मधील संपूर्ण बांधकामाची स्वतंत्र तांत्रिक तपासणी करण्यात यावी, मंजूर निधी, अंदाजपत्रक, कार्यादेश, मोजमाप पुस्तिका, बिल व देयकांची पडताळणी करण्यात यावी आणि दोष आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

आता या प्रकरणात सार्वजनिक बांधकाम विभाग आणि संबंधित वरिष्ठ अधिकारी काय भूमिका घेतात, तसेच चौकशीतून नेमके काय समोर येते, याकडे सालेकसा परिसराचे लक्ष लागले आहे.

## डब्लूसीएल अप्रेंटिसशिप पूर्ण उमेदवारांचे १३ ऑगस्टला मुख्यालयावर आंदोलन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडमध्ये अप्रेंटिसशिप पूर्ण करूनही रोजगाराच्या प्रतीक्षेत असलेल्या प्रशिक्षित उमेदवारांनी आपल्या रोजगाराच्या हक्कासाठी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. अप्रेंटिसशिप पूर्ण केलेल्या उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, या प्रमुख मागणीसाठी गुरुवार, १३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत, हउछ मुख्यालय, नागपूर येथे भव्य आंदोलन करण्यात येणार आहे. अप्रेंटिसशिपच्या माध्यमातून प्रशिक्षण घेतल्यानंतर प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळवूनही मोठ्या संख्येने प्रशिक्षित युवक रोजगाराच्या प्रतीक्षेत आहेत. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध होत नसल्याने उमेदवारांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. त्यामुळे डब्लूसीएल व्यवस्थापनानेअप्रेंटिसशिप पूर्ण केलेल्या उमेदवारांच्या रोजगाराच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात येत आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांच्या प्रतिनिधींनी आवश्यक परवानगीची प्रक्रिया पूर्ण केली आहे.

गुरुवारी १३ ऑगस्ट रोजी, WCL CMD कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, SDM कार्यालय, DCP कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय, सदर पोलीस ठाणे तसेच गिट्टीखदान पोलीस ठाणे येथे आंदोलना संदर्भात परवानगी असून या आंदोलनाच्या माध्यमातून WCL मध्ये अप्रेंटिसशिप पूर्ण केलेल्या उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध करून द्यावी, प्रशिक्षित उमेदवारांच्या रोजगाराच्या प्रश्नावर तातडीने तोडगा काढावा आणि त्यांच्या भवितव्याचा सकारात्मक विचार करावा, अशा प्रमुख मागण्या करण्यात येणार आहेत. आंदोलन शांततापूर्ण व लोकशाही मार्गाने करण्यात येणार आहे.

# 'जेन-झी'ला गणिताची गोडी लावण्यासाठी वैदिक गणित प्रभावी माध्यम : कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर

**वैदिक गणितावरील त्रि-दिवसीय राष्ट्रीय परिषदेला उत्साहात प्रारंभ, देशभरातील १५० गणितज्ञ, संशोधक व शिक्षणतज्ज्ञांचा सहभाग**

**दै. सिंहवाणी वृत्त,नागपूर**

नवनिर्मितीचा विचार गणिताशिवाय करणे अशक्य आहे. प्राचीन भारतीय मंदिरे आणि वास्तूंच्या स्थापत्यशास्त्राचाही पाया गणितावर आधारित आहे. आज जगभरात भारतीय संस्कृती आणि ज्ञानपरंपरा जाणून घेण्याची उत्सुकता वाढत आहे. विशेषतः नव्या पिढीला अर्थात 'जेन-झी'ला गणिताची गोडी लावण्यासाठी वैदिक गणित महत्त्वाची भूमिका बजावू शकते, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी केले.

'भारतीय ज्ञान परंपरा (गणित) आणि वैदिक गणित' या विषयावरील त्रि-दिवसीय राष्ट्रीय परिषद व कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. श्री विश्व पुनर्निर्माण संघ आणि शिक्षा संस्कृती उत्थान न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित




या राष्ट्रीय परिषदेला शुक्रवारी भारती कृष्ण विद्या विहार, जगद्गुरू परिसर, सिव्हिल लाईन्स येथे उत्साहात प्रारंभ झाला.

डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन झाले. विश्व पुनर्निर्माण संघाचे अध्यक्ष कुमार काळे अध्यक्षस्थानी होते. शिक्षा संस्कृती उत्थान न्यासचे राष्ट्रीय संघटन मंत्री डॉ. अतुल कोठारी, विश्व पुनर्निर्माण संघाचे महासचिव शैलेश जोगळेकर, संघाचे विश्वस्त व वैदिक गणित संयोजक श्रीकांत देशपांडे, शिक्षा संस्कृती उत्थान न्यासचे राष्ट्रीय संयोजक डॉ. श्रीराम चौथाईवाले यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

डॉ. क्षीरसागर म्हणाल्या, भारतीय ज्ञानपरंपरेत गणिताला अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्राचीन भारतीय वास्तुकला आणि मंदिरांच्या स्थापत्यामागे गणिताचा भक्कम आधार दिसून येतो. आधुनिक काळातील नवकल्पना आणि नवनिर्मितीही गणिताशिवाय शक्य नाही. त्यामुळे देशाला नवी दिशा देण्याच्या दृष्टीने अशा परिषदा आणि कार्यशाळा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. वैदिक गणिताच्या माध्यमातून गणित अधिक रंजक आणि सहज करता आले तर नव्या पिढीमध्ये या विषयाबद्दल रुची निर्माण होण्यास निश्चितच मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

**वैदिक गणिताचा अभ्यास हीदेखील एक साधना : डॉ. अतुल कोठारी**

डॉ. अतुल कोठारी म्हणाले, वैदिक गणिताच्या साधकांसाठी त्याच्या उगमाशी जोडलेल्या या पवित्र परिसरात राष्ट्रीय कार्यशाळा होणे ही मोठी पर्वणी आहे. वैदिक गणिताचा अभ्यास हीदेखील एक प्रकारची साधना आहे. आज जगासमोरील अनेक समस्यांची उत्तरे भारतीय ज्ञानपरंपरेत दडलेली आहेत.

विद्यार्थ्यांच्या मनातील गणिताची भीती कमी करून त्यांना आनंददायी पद्धतीने गणित शिकविण्याची क्षमता वैदिक गणितात आहे. भारताला विश्वगुरू व्हायचे असेल तर जगाला शिक्षण क्षेत्रात काहीतरी नवीन आणि उपयुक्त देण्याची क्षमता आपल्याला निर्माण करावी लागेल. वैदिक गणितात ती शक्ती आहे, असे डॉ. कोठारी यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात कुमार काळे यांनी वैदिक गणिताच्या अध्ययन, अध्यापन आणि संशोधनाला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी वैदिक गणित सेंटर ऑफ एक्सलन्स सुरू करण्यात येणार असल्याची माहिती दिली. त्यांनी राष्ट्रीय परिषद व कार्यशाळेतील सहभागी अभ्यासकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी अब्स्ट्रॅक्ट बुक चे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमास विश्व पुनर्निर्माण संघाचे सर्व विश्वस्त उपस्थित होते. उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन अनिता समुद्रे यांनी केले तर प्रास्ताविक श्रीराम चौथाईवाले यांनी केले. श्रीकांत देशपांडे यांनी स्वागतपर भाषण करून संस्थेचे महत्व पटवून दिले.

**देशभरातील तज्ज्ञांचा सहभाग**

वैदिक गणिताचे प्रणेते जगद्गुरू शंकराचार्य भारती कृष्ण तीर्थ यांच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेल्या परिसरात आयोजित या परिषदेत देशभरातून सुमारे १५० गणितज्ञ, शिक्षक, संशोधक आणि शिक्षणतज्ज्ञ सहभागी झाले आहेत.

तीन दिवस चालणाऱ्या परिषदेत भारतीय गणित परंपरा, वैदिक गणिताची उपयुक्तता, अध्यापनातील अभिनव पद्धती तसेच गणित शिक्षण अधिक सुलभ, रंजक आणि प्रभावी करण्यासंदर्भातील विविध विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. यासोबत शोधपत्र सादरीकरण, तांत्रिक सत्रे आणि प्रशिक्षण कार्यशाळांचेही आयोजन करण्यात आले आहे.

थोडक्यात

## राष्ट्रीय हातमाग सप्ताहानिमित्त इनर व्हील क्लब ऑफ नागपूरचा गांधी हँडलूम हाऊसला शैक्षणिक भेट कार्यक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राष्ट्रीय हातमाग सप्ताहानिमित्त इनर व्हील क्लब ऑफ नागपूरने अध्यक्षा पूजा सावजी यांच्या नेतृत्वाखाली गुरुवार, ६ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजता गांधी हँडलूम हाऊस (निंबोली) येथे शैक्षणिक भेट आयोजित केली. भारताच्या समृद्ध हातमाग परंपरेची माहिती सदस्यांना व्हावी तसेच या परंपरेला जिवंत ठेवणाऱ्या कुशल विणकरांप्रती आदर निर्माण व्हावा या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. या भेटीत क्लबच्या १५ सदस्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. निंबोलीच्या संचालिका निधी गांधी यांनी सदस्यांचे मनःपूर्वक स्वागत करून हातमाग वस्त्रनिर्मितीची संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्ष दाखवली. कापूस व रेशीम धाग्यांची तयारी, बीमवर धागे चढविणे आणि पारंपरिक लाकडी हातमागावर विणकाम करण्याची प्रत्येक पायरी त्यांनी सविस्तर समजावून सांगितली.

सदस्यांनी विणकाम विभागाला भेट देऊन तेथे कार्यरत असलेल्या महिला व अनुभवी कारागिरांशी संवाद साधला. नागपूरच्या चौथ्या पिढीतील एका विणकराने आपल्या अनुभवांची माहिती दिली. साधी हातमागावरील साडी तयार करण्यासाठी दोन ते तीन दिवस लागतात, तर आकर्षक डिझाइन, काठ आणि नक्षीकाम असलेली साडी तयार करण्यासाठी सात ते आठ दिवसांचे परिश्रम लागतात, ही माहिती सदस्यांना मिळाली. तसेच नोंदणीकृत विणकरांना मिळणारी ओळखपत्रे, साप्ताहिक सुट्ट्या आणि शासकीय योजनांचा लाभ याबाबतही माहिती देण्यात आली. सदस्यांनी कुशल कारागिरांकडून अत्यंत बारकाईने केले जाणारे झरदोसी आणि आरी भरतकामही पाहिले. बांबू सिल्क, बांबू कॉटन, केळी सिल्क आणि केळी कॉटनपासून तयार करण्यात आलेल्या पर्यावरणपूरक वस्त्रांचा तसेच विविध हातमाग उत्पादनांचा सुंदर संग्रह पाहून सदस्य प्रभावित झाले.

निधी गांधी यांनी भारतीय हातमाग परंपरेच्या जतन आणि संवर्धनासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या कायार्ची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली असून संयुक्त राष्ट्रांच्या प्रकाशनात भारतातील हातमाग क्षेत्राशी संबंधित २५ मान्यवर महिलांमध्ये त्यांचा समावेश करण्यात आला आहे. ही नागपूर व देशासाठी अभिमानाची बाब आहे. कार्यक्रमानंतर सर्व सदस्यांसाठी स्वादिष्ट हाय-टीची व्यवस्था करण्यात आली.

तसेच निधी गांधी यांनी प्रत्येक सदस्याला 'होली सेज' टेबल रनर भेट देऊन स्मरणिका प्रदान केली. अध्यक्षा पूजा सावजी यांनी निधी गांधी यांचे मनःपूर्वक आभार मानत त्यांच्या आदरातिथ्याबद्दल, प्रेरणादायी मार्गदर्शनाबद्दल आणि भारतीय वस्त्रपरंपरा जपण्यासाठी केलेल्या अथक प्रयत्नांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. अशा शैक्षणिक भेटींमुळे भारतीय कारागिरांबद्दलचा आदर वाढतो आणि पर्यावरणपूरक हातमाग उत्पादनांना प्रोत्साहन मिळते, असे त्यांनी सांगितले. ही भेट अत्यंत ज्ञानवर्धक आणि प्रेरणादायी ठरली. सदस्यांना भारतीय हातमाग उद्योगाचे सांस्कृतिक, कलात्मक आणि सामाजिक-आर्थिक महत्त्व अधिक सखोलपणे समजले. भारताचा समृद्ध वस्त्रोद्योग वारसा पुढील पिढ्यांसाठी जतन करण्याची प्रेरणा या भेटीतून सर्वांना मिळाली.

## स्मृतिदिन समाजोपयोगी उपक्रमाने साजरा, मानवटकर कुटुंबीयांकडून धम्मकार्याकरिता ५ हजारांचे धम्मदान



**दै. सिंहवाणी वृत्त, महादुला**

दिवंगत गौतम संतोष मानवटकर यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त श्रद्धांजली, परित्राण, धम्मदान व सामूहिक भोजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्मृतिदिनाचे औचित्य साधत मानवटकर कुटुंबीयांनी अनागारिक धम्मपाल बौद्ध विहार, महादुला येथील धम्मकार्याकरिता ५ हजारांचे धम्मदान देत समाजोपयोगी उपक्रमातून स्मृतिदिन साजरा केला. कार्यक्रमाची सुरुवात मानवटकर यांच्या राहत्या घरी परित्राणाने झाली. त्यानंतर उपस्थितांनी दिवंगत गौतम संतोष मानवटकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. सायंकाळी आर. जी. सेलिब्रेशन लॉन, महादुला येथे आयोजित सामूहिक भोजन कार्यक्रमात नातेवाईक, मित्रपरिवार, समाजबांधव तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. आयुष्यमती विमल संतोष मानवटकर, आयुष्यमती उज्ज्वला गौतम मानवटकर व मानवटकर कुटुंबीयांच्या वतीने अनागारिक धम्मपाल बौद्ध विहारातील धम्मकार्याकरिता ५ हजारांचे धम्मदान करण्यात आले. सदर धम्मदान महामाया महिला मंडळ, महादुला यांच्या स्वाधीन करण्यात आले. महिला मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांनी धम्मदानाचा स्वीकार करून मानवटकर कुटुंबीयांचे आभार मानले.

यावेळी महिला मंडळाच्या सदस्यांनी दिवंगत गौतम संतोष मानवटकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ राबविण्यात आलेल्या समाजोपयोगी उपक्रमाचे स्वागत केले. धम्म, सेवाभाव व सामाजिक उत्तरदायित्वाची भावना अधिक दृढ व्हावी तसेच स्मृतिदिनानिमित्त समाजहिताचे उपक्रम राबविण्याची प्रेरणा मिळावी, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे मानवटकर कुटुंबीयांनी सांगितले. या प्रसंगी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समारोह समिती, अनागारिक धम्मपाल बौद्ध विहार समिती तसेच महामाया महिला मंडळ, महादुला यांच्या वतीने मानवटकर कुटुंबीयांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले. उपस्थितांनी समाजोपयोगी उपक्रमाचे कौतुक करत दिवंगत गौतम संतोष मानवटकर यांना भावपूर्ण अभिवादन केले.

# दिव्यांगाच्या साहित्य वाटप शिबीरात महापौरांनी साधला लाभार्थ्यांशी हृदयस्पर्शी संवाद

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींना नि:शुल्क साहित्य वाटप सोमवार १० रोजी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अनेकदा असंख्य अडचणींचा सामना करणाऱ्या अस्थिव्यंग व कर्णबधिर प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींशी निःशुल्क जयपूर फूट साहित्य व साधने मोजमाप व वाटप शिबिरात महापौर निता ठाकरे यांनी हृदयस्पर्शी संवाद साधला. शिबिरात लाभ प्राप्त झालेल्या लाभार्थ्यांनी महापौरांपुढे आयोजकांचे मनस्वी आभार व्यक्त केले. लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावरील स्मित हास्य व आनंदाची अनुभूती बघून आपले कार्य सार्थक झाल्याची भावना महापौर निता ठाकरे यांनी व्यक्त केली.



याप्रसंगी मनपा आयुक्त डॉ. विपीन, सत्तापक्ष नेते नरेंद्र बोरकर, मुख्यमंत्री सचिवालय येथील सहसचिव आशा पठाण, माजी महापौर दयाशंकर तिवारी, अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम एम., समाज विकास विभागाच्या उपायुक्त डॉ. रंजना लाडे, उपायुक्त निर्भय जैन, उपायुक्त राजेश भगत, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, सहायक आयुक्त नरेंद्र बावनकर, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी स्वप्निल लोखंडे, सहायक आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार, क्रीडा अधिकारी डॉ. पियूष अंबुलकर व अभिजीत राऊत, यांच्यासह भगवान महावीर विकलांग सहायता समितीचे नारायण व्यास, समन्वयक सुबोध भंडारी उपस्थित होते.

दिव्यांग, अंध, कर्णबधीरांना जयपूर फूट सह आवश्यक सहायक साहित्य देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून नागपूर महानगरपालिका, भगवान महावीर विकलांग सहायता समिती, नागपूर जिल्हा परिषद, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र व टाटा ट्रस्टने संयुक्त विद्यमाने ७ ते १० ऑगस्ट दरम्यान शिबिर आयोजित केले आहे. कविवर्य सुरेश भट सभागृह परिसरात आयोजित शिबिराला लाभार्थीचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. विशेष म्हणजे, सोमवार १० रोजी सकाळी ९ वाजता कविवर्य सुरेश भट सभागृह येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत साहित्याचे वाटप केले जाणार आहे. अशी माहिती महापौर निता ठाकरे यांनी दिली.

महापौर निता ठाकरे यांनी सांगितले की, मनपाद्वारे शिबिरात येणाऱ्या दिव्यांग बांधवाना उत्तम सोयीसुविधा प्रदान केल्या जात आहेत. यावेळी एनसीसी, व एनएसएसचे स्वयंसेवक नागरिकांना सहकार्य करीत आहे. सदर शिबिराचे दिनांक ०७/०८/२०२६ रोजी उद्धाटन करण्यात आले. सदर शिबिरात दिव्यांग लाभार्थ्यांना ने-आण करण्याकरिता झोननिहाय महानगरपालिकेच्या परिवहन विभागाच्या बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे.

तसेच शिबिराला उपस्थित राहणाऱ्या दिव्यांग लाभार्थ्यांकरिता तसेच सोबत येणाऱ्या मदतनीसांकरिता नाश्ता, चहा व भोजनाची सुद्धा व्यवस्था करण्यात आली आहे. सदर शिबिरात दिव्यांग लाभार्थ्यांना वऊळ कार्ड, संजय गांधी निराधार योजनासह १७ प्रकारचे साहित्य उपलब्ध करून देण्यात येत आहे.

# अनधिकृत बांधकाम वापर करणाऱ्या धोकादायक आस्थापनांवर समन्वयाने कारवाई करा!

### महापौर निता ठाकरे यांचे बैठकीत निर्देश



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर शहरातील अनधिकृत बांधकामे, अनधिकृत वापर व धोकादायक आस्थापनांविरुद्ध महानगरपालिकेच्या सर्व संबंधित विभागांनी एकत्रितपणे, समन्वयाने व कालबद्ध पद्धतीने कार्यवाही करावी. असे निर्देश महापौर निता ठाकरे यांनी दिले.

नागपूर शहरातील अनधिकृत बांधकामे, मंजूर बांधकाम नकाशाविना करण्यात आलेले बांधकाम, अनधिकृत वापरबदल, अग्निसुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक आस्थापना तसेच अतिक्रमण याबाबत संबंधित विभागांच्या समन्वयाने प्रभावी कार्यवाही करण्यासाठी शनिवारी (ता.८) महापौर निता ठाकरे यांच्या अध्यक्षतेत आढावा बैठक घेण्यात आली.

यावेळी सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर स्थापत्य व बांधकाम विशेष समिती सभापती अश्विनी जिचकार, अग्निशमन व विद्युत विशेष समिती सभापती रूपाली ठाकूर, मनपाचे अतिरिक्त आयुक्त अंकित, अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, उपायुक्त मंगेश खवले, नगररचना विभाग, संबंधित झोनचे सहायक आयुक्त, मुख्य अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके, विभागीय अग्निशमन अधिकारी व सर्व केंद्र अधिकारी, अग्निशमन विभाग तसेच इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

महापौर निता ठाकरे यांनी प्रत्येक झोनमध्ये किमान १० प्रकरणे निश्चित करून त्यावर संयुक्त कार्यवाही करणे, नगररचना विभागाकडून मंजूर बांधकामांची झोननिहाय माहिती घेऊन प्रत्यक्ष परिस्थितीशी पडताळणी करणे आणि गंभीर उल्लंघनांवर कोणतीही तडजोड न करता कायद्यानुसार कठोर कार्यवाही करणे, बाबत प्रमुख निर्देश दिले.

# झाडीपट्टी नाट्य अकादमी स्थापन करा!

- नागपूर कराराला वैधानिक दर्जा प्रदान करा, वैधानिक विकास मंडळे तसेच विदर्भ विकास मंडळ पुनर्स्थापित करा
- विदर्भाचा सांस्कृतिक अनुशेष भरून देण्यासाठी अशासकीय तज्ज्ञांची समिती स्थापन करा
- विदर्भाचा संस्कृती आधारित विकास अहवालावर कार्यवाही करा
- विधानपरिषदेवरील राखीव बारा जागांवर प्रतिभावंताच्या नियुक्त्यांच्या अनुशेषाची भरपाई करा, नियुक्त्या राजकारण्यांच्या नव्हे
- घटनेत नमूद प्रत्येक वर्गवारीतील तज्ज्ञांच्या करा
- विकास आणि नियोजन यंत्रणांमधून सांस्कृतिक संस्थात्मक विश्वाला प्रतिनिधित्व द्या
- सांस्कृतिक संस्थात्मक विश्वाच्या राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांकडे मागण्या



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

२०१४ साली ' विदर्भाचा संस्कृती आधारित विकास ', या विदर्भ विकास मंडळाच्या, तत्कालीन राज्यपालांनी नेमलेल्या उपसमितीने सादर केलेल्या अहवालात केलेल्या सूचनेनुसार १२ वर्ष ते तसेच पडून राहिलेली 'झाडीपट्टी नाट्य अकादमी' स्थापण्याच्या सूचनेचा पुनरुच्चार २० जुलै रोजी झालेल्या राज्य मराठी विकास संस्थेच्या सभेतही केला गेला असल्याने आता तरी ही अकादमी स्थापन करण्यासाठीची कार्यवाही सुरू करावी, नागपूर कराराला वैधानिक दर्जा प्रदान करा. वैधानिक विकास मंडळे तसेच विदर्भ विकास मंडळ पुनर्स्थापित करा, विदर्भाचा सांस्कृतिक अनुशेष भरून देण्यासाठी अशासकीय तज्ज्ञांची समिती स्थापन करा,विदभार्चा संस्कृती आधारित विकास अहवालावर कार्यवाही करा,ती समिती पुनर्स्थापित करा. विधानपरिषदेवरील राखीव बारा जागांवर प्रतिभावंताच्या नियुक्त्यांच्या अनुशेषाची भरपाई करा, नियुक्त्या राजकारण्यांच्या नव्हे. घटनेत नमूद प्रत्येक वर्गवारीतील तज्ज्ञांच्या करा,विकास आणि नियोजन यंत्रणांमधून सांस्कृतिक संस्थात्मक विश्वाला प्रतिनिधित्व द्या अशा दीर्घकाळ राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांकडे प्रलंबित असलेल्या काही मागण्यांचे स्मरण राज्याच्या सांस्कृतिक संस्थात्मक विश्वाच्या वतीने राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांना करून देण्यात आले आहे.

जन सांस्कृतिक विकास प्रतिष्ठान,मराठीच्या व्यापक हितासाठी, वैश्विक मराठी परिवार, महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडी,अखिल भारतीय मराठी भाषा-संस्कृती परिषद,अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, महाराष्ट्र राज्य भाषा सल्लागार समिती या सांस्कृतिक संस्था, समुहांचे अध्यक्ष, पूर्वाध्यक्ष, प्रमुख संयोजक असलेले डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी या सांस्कृतिक संस्था समुहांतर्फे राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांना पत्र पाठवून हे स्मरण करून दिले आहे.

महाराष्ट्र हा संयुक्त महाराष्ट्र असून, विदर्भ हा प्रांत महाराष्ट्रात नागपूर करार करून समाविष्ट झालेला आहे.या कराराला राज्य स्थापनेनंतर ६६ वर्षे होऊनही अजूनही वैधानिक दर्जा प्राप्त करून दिला गेलेला नाही. परिणामी विदर्भाला राजधानी सोडून महाराष्ट्रात आपण गेलो पण आपली फसवणूक झाल्याचे शल्य कायम आहे. विदर्भात विलगतेची भावना तेवत ठेवण्याच्या राजकारणासाठी हे केले गेले आहे. ही स्थिती दूर सारून महाराष्ट्रातील सर्व विभागांचे भाषिक, सांस्कृतिक ऐक्य स्थापले जाणे, महाराष्ट्र अखंड राखण्यासाठी आवश्यक आहे.त्यामुळे नागपूर कराराला वैधानिक दर्जा प्रदान करत त्यानुसार जे देय आहे ते सर्व तातडीने,अनुशेषासह कृपया भरून दिले जाईल अशी कृती केली जावी अशी मागणी डॉ जोशी यांनी केली आहे.

भारतीय राज्यघटनेत या पार्श्वभूमीवरच कलम ३७१ (२) अन्वये विदर्भ, मराठवाडा यांच्यासाठी स्वतंत्र विकास मंडळे स्थापन करण्याची तरतूद केली गेली आहे. मात्र २०२० पासून 'विदर्भ विकास मंडळ' अस्तित्वात नाही. ते तातडीने पुनर्स्थापित करण्यात यावे अशीही मागणी केली गेली आहे. भौतिक अनुशेषापेक्षाही विदर्भाचा सांस्कृतिक अनुशेष मोठा आहे. संस्कृती ही अमूर्त बाब असली तरीही त्या अनुशेषाचे आर्थिक, भौतिक अनुशेषात मोजमाप शक्य आहेच. फक्त ते करण्याच्या राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आहे.परंतु यासाठी अशासकीय तज्ज्ञांची समिती नेमून त्याचे मोजमाप करण्यासाठी व तो भरून काढण्यासाठी प्रयत्न होणे नितांत गरजेचे आहे.तशी समिती तातडीने स्थापली जावी अशीही मागणी पत्रात करण्यात आली आहे.

के. शंकरनारायणन राज्यपाल असताना या सांस्कृतिक अनुशेषाकडे महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडीतर्फे लक्ष वेधले गेले होते व राज्यपालांनी त्यानुसार, राज्याच्या इतिहासात प्रथमच संस्कृती आधारित विकासाची संकल्पना मान्य करत, विदर्भ विकास मंडळाची, 'विदर्भाचा संस्कृती आधारित विकास' अशी एक समिती नेमण्याचे निर्देश दिले होते. डॉ. मृणालिनी फडणवीस, डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी आणि रोहन नागदिवे या तज्ज्ञांची ती समिती होती.

त्या समितीने विदर्भातील झाडीपट्टी रंगभूमी विकासाच्या दृष्टीने एक पथदर्शी प्रकल्प, सर्वेक्षण-अध्ययनाधारित अहवाल तयार करून शिफारशींसह राज्यपालांना व मुख्यमंत्र्यांना सादर केला होता. त्याच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडीतर्फे सतत पाठपुरावा करत आहे . मात्र आजवर त्याबाबत कोणतीही कार्यवाही केली गेलेली नाही.ती व्हावी अशी मागणी डॉ जोशी यांनी केली आहे. राज्याच्या विधानपरिषदेत राज्यपालांनी भारतीय राज्यघटनेत वर्णित पाच प्रकारच्या वर्गवारीत मिळून १२ प्रतिभावान अभ्यासक, समर्पित व्यक्ती नेमण्याची तरतूद आहे.

गेल्या ६६ वर्षात अशा राजकीय पक्ष निरपेक्ष खऱ्या तज्ज्ञ प्रतिभावान व्यक्तींच्या नेमणुका अपवादानेच झाल्या.बाकी त्या जागा राज्यकर्त्यांनी राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांना उपकृत करण्यासाठीच वापरल्या आहेत. परिणामी या वर्गवारीतील नियुक्त्यांचा मोठा अनुशेष निर्माण झालेला आहे. तो भरून काढावा आणि या नियुक्त्या घटनेत वर्णित पाच प्रकारच्या वर्गवारीतून प्रत्येक वर्गानुसार, राजकारण्यांच्या न करता, त्या क्षेत्रातील सच्च्या तज्ज्ञ प्रतिभावंतांच्याच व्हाव्यात यासाठी उच्च न्यायालयात महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडीतर्फे दाखल केलेली जनहित याचिका प्रलंबित आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांमधून तसेच अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने ठराव करून ही याचिका निकालात काढण्यासाठी राज्यपाल, मुख्यमंत्री व राज्याने उच्च न्यायालयात या नियुक्त्यांचा अनुशेष भरून काढला जाईल व नियुक्त्या केवळ घटनेत वर्णन केलेल्या प्रत्येक वर्गवारीतील तज्ज्ञ प्रतिभावंतांच्याच होतील आणि त्या जागा राजकारण्यांना उपकृत करण्यासाठी वापरल्या जाणार नाहीत असे उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करून आश्वासित करावे अशा केलेल्या ठरावांचे पत्रात स्मरण करून देत, असे करावे अशी मागणी करण्यात आली आहे.

नुकतीच विधीमंडळात वैधानिक विकास मंडळं पुनरर्चित करण्याच्या मुद्यावर चर्चा झाली. ती तातडीने स्थापली जावीत अशीही मागणी केली गेली आहे. या मंडळांवर संस्कृती आधारित विकासासाठी, सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत, महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडी, जन सांस्कृतिक विकास प्रतिष्ठान, विदर्भ सांस्कृतिक परिषद अशा संस्थांच्या व तत्सम विभागीय संस्थांच्या प्रतिनिधींना नेमण्यात यावे अशीही मागणी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी केली आहे. राज्याला सांस्कृतिक धोरण दिले गेले आहे.

मात्र संस्कृती आधारित विकासासाठी अंदाजपत्रकात स्वतंत्र तरतूद वारंवार मागणी करूनही केली जात नाही.ती करण्यात यावी. त्याचप्रमाणे जिल्हा, विभागीय, राज्य व राष्ट्रीय पातळीवरील विकास नियोजनाशी संबंधित सर्व पातळ्यांवरील मंडळे, समित्या इ.मधून संस्कृती क्षेत्राला स्वतंत्रपणे प्रतिनिधित्व देण्यात यावे अशा मागण्या अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांनी अनेकदा ठराव करून केल्या आहेत. ते ठराव वेळोवेळी राज्यपाल व मुख्यमंत्री यांना पाठवले गेले आहेत. त्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. याकडे पुनः लक्ष वेधत तसेच महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडी, जन सांस्कृतिक विकास प्रतिष्ठान, विदर्भ सांस्कृतिक परिषद या व अशा सांस्कृतिक क्षेत्रासाठी कार्यरत संस्था समुहांना या यंत्रणांमधून व दक्षिण मध्य सांस्कृतिक केंद्र यातून प्रतिनिधित्व दिले जाण्यासाठी तसे निर्देश संबंधितांना राज्यपालांनी द्यावेत अशी विनंती देखील पत्रात करण्यात आली आहे.

# खापरखेडा दगडीचाळ गँगवार प्रकरणातील मुख्य आरोपी अद्यापही मोकाटच

## तीन आरोपीना अटक एक अल्पवयीन ताब्यात, आरोपींची एकूण संख्या ९ वर




**दै. सिंहवाणी वृत्त, श्रीकांत जालंधर- खापरखेडा**

खापरखेडा मुख्य बाजारपेठेतील गँगवार प्रकरणात शहर गुन्हे शाखा युनिट क्रमांक ६ च्या पथकाने तीन आरोपीसह एका अल्पवयीन मुलाला ८ ऑगस्ट शुक्रवारला रात्री उशिरा खापरखेडा पोलिसांच्या स्वाधीन केले. सदर प्रकरणात एकूण आरोपीची संख्या ९ झाली खापरखेडा पोलिसानी तिन्ही आरोपीना अटक केली असून न्यायालयात सादर केले असता तीन दिवसांची पोलीस कोठडी ठोठावण्यात आली आहे. तर अल्पवयीन मुलाला बालसुधारगृहात पाठवण्यात आले आहे. मात्र अद्यापही दगडी चाळीचा मोहरक्या व त्यांच्या टोळीतील कुख्यात आरोपी पसार झाले असून मुसक्या कधी आवळणार असा प्रश्न संतप्त नागरिक करीत आहे.

हेमंत उर्फ सुदामा मधुकर चाफाडहाके वय २६, शांतनू उर्फ दद्दु राजेंद्र बागडे वय १९, जितू रामचंद्र कनोजिया वय २६ सर्व रा. खापरखेडा असे असून पिली हेवली कामठी येथून एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले आहे. यापूर्वी मोहन ठाकूर खुरावत, प्रियांशू विद्याधर रक्षित, युगांत राजेश सारवे व दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेण्यात आले आहेत.

नागपूर शहर गुन्हे शाखा युनिट क्रमांक ६ च्या पथकाने अटक केलेल्या जितू कनोजिया याला खापरखेडा पोलिसांनी दोन दिवसांपूर्वी ताब्यात घेतले होते. घटनेच्या दिवशी जितू कुमावत वाईन शॉपमध्ये दारू आणायसाठी गेला होता. खापरखेडा पोलीसांना तपासादरम्यान जितूकडून काही आढळून आले नाही, त्यामुळे त्याला सोडून देण्यात आले. मात्र शहर गुन्हे शाखा पथकाने जितू कनोजिया याला ताब्यात घेऊन खापरखेडा पोलिसांच्या स्वाधीन केले. त्यामुळे अनेक प्रश्न उपस्थित होत आहे. दगडी चाळ गँगवार प्रकरणात समाविष्ट असलेल्या आरोपीवर कठोर कार्यवाई होणे अपेक्षित आहे. मात्र निर्दोष बळी पडायला नको, याकरिता पोलिसांनी शहानिशा करून गुन्हे दाखल करावे अशी मागणी होत आहे.



उपचारानंतर रूग्णालयातून सुट्टी घेऊन परतलेला या घटनेतील जखमी हिमांशू कडू

२ ऑगस्टला रात्री खापरखेडा मुख्य बाजारपेठेतील दगडी चाळ टोळीच्या हल्ल्यात तलवार, चाकू व इतर शस्त्रांचा वापर करून तीन तरुणांवर प्राणघातक हल्ला चढविण्यात आला. सदर घटनेत हिमांशू कडू, रोहित मेश्राम व रक्षित कापसे गंभीर जखमी झाले. मुळात दगडी चाळ टोळीचे टार्गेट सुमित व डगग्म होते. मात्र ते मुख्य बाजारपेठेत आढळून आले नाही हल्ल्यात हिमांशू, रोहित व रक्षित दगडी चाळ टोळीचे बळी ठरले.

## पोलिस उपआयुक्त कार्यालयात उपस्थित केल्यानंतर आरोपींची कारागृहात रवानगी

**८ ऑगस्ट** शनिवारला नागपूर शहर सह पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी खापरखेडा पोलीस स्टेशन गाठले. दगडी चाळ गँगवार प्रकरणाचा आढावा घेतला यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश दिल्याची माहिती आहे.

---

**१ ऑगस्ट** रोजी मुख्य बाजारपेठेत राजबाबा बियर बार समोर भांडण झाले. त्यानंतर अक्षय उर्फ डगग्म पुरुषोत्तम भोसकर, वय २९ वर्षे, रा. वॉर्ड नं. २, मिलन चौक, चनकापुर, अनिकेत संघसेवक वासनिक, वय १८ वर्षे, रा. वॉर्ड नं. ४, खापरखेडा, पियुष हिरामण पाल, वय २० वर्षे, रा. वॉर्ड नं. ३ खापरखेडा, सुनिल रामदास वाघधरे, वय ४२ वर्षे, रा. वॉर्ड नं. २ चनकापुर, खापरखेडा यांनी दगडी चाळीत जाऊन तडीपार आरोपी विक्रम व सुदामा याला मारहाण केली. सूड उगवण्यासाठी २ ऑगस्ट रोजी मुख्य बाजारपेठेत गँगवार घडले. दगडी चाळीत मारहाण करणाऱ्या आरोपींना पोलीस उप-आयुक्त कार्यालयात सादर करण्यात आहे. सायंकाळी सर्व आरोपीची तुरुंगात रवानगी करण्यात आली. यापूर्वी डगग्मची तुरुंगात रवानगी करण्यात आली आहे.



परिसरात पुन्हा असा अनुचित प्रकार घडू नये, या अनुषंगाने जखमी हिमांशू कडू याच्या घराजवळ खापरखेडा पोलिस कर्मचारी सशस्त्र पहारा देत आहे.

दगडी चाळ गँगवार प्रकरणात अजूनही डझन भराच्यावर आरोपी अटक होणे शिल्लक आहेत. यादरम्यान गंभीर जखमी हिमांशू कडूच्या कुटुंबीयांनी रुग्णालयातून ८ ऑगस्ट शनिवारला सुट्टी घेतली आहे.

### थोडक्यात

## लोधी समाज गोंदिया व आलोक महाराष्ट्रतर्फे माजी आमदार भेरसिंहभाऊ नागपुरे यांचा शिष्टाचार भेटीद्वारे वाढदिवस साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा - राजु फुंडे**

लोधी समाज गोंदिया व लोधी समाज सेवा आलोक महाराष्ट्र यांच्या पदाधिकाऱ्यांनी लोधी समाजाचे ज्येष्ठ मार्गदर्शक, माजी आमदार, गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष तसेच आमगाव तालुका सहकारी शेतकरी खरेदी-विक्री समितीचे अध्यक्ष भेरसिंहभाऊ नागपुरे यांची त्यांच्या निवासस्थानी शिष्टाचार भेट घेऊन वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी समाजाच्या विविध उपक्रमांबाबत, संघटन बळकटीकरण, शिक्षण, कृषी, युवक सक्षमीकरण तसेच सामाजिक विकासाच्या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. उपस्थित पदाधिकाऱ्यांनी भेरसिंहभाऊ नागपुरे यांच्या नेतृत्वाचे व समाजहितासाठी केलेल्या कार्याचे कौतुक करत त्यांना प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व असल्याचे सांगितले. या प्रसंगी नागपुरे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी, दीघार्युष्यासाठी आणि समाजसेवेचा अखंड प्रवास असाच सुरू राहावा, अशी सदिच्छा व्यक्त करण्यात आली.

भेरसिंहभाऊ नागपुरे यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानत समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शिक्षण, एकजूट आणि युवकांच्या सहभागाला प्राधान्य देण्याचे आवाहन केले. आगामी काळात समाजहिताचे उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी लोधी समाजचे येशूलाल उपराडे, जागेश्वर लिल्हारे, राजीव ठकरेले, आलोक महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष नरेंद्रकुमार लिल्हारे, रोशन लिल्हारे, ज्ञानीराम बनोठे, राजकुमार बसोने, तोषलाल लिल्हारे, रोशन गराडे, के. सी. मच्छिरके, देवेंद्र मच्छिरके, युवराज बसोने, विवेक मस्करे, प्रवीण धामडे, मनोज दमाहे, मिथलेश दमाहे, लोधी समाज गोंदिया व आलोक महाराष्ट्रचे पदाधिकारी, समाजबांधव व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा नियोजन समितीकडे उषाताई मेंढे यांच्या विविध मागण्या,

### साखरीटोला येथे स्वतंत्र पोलीस ठाणे उभारण्यासह पुलांच्या बांधकामासाठी निधीची मागणी



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा - राजु फुंडे**

नुकतीच जिल्हा परिषद काँग्रेसच्या गटनेतेपदी विद्यमान जिल्हा परिषद सदस्य तथा माजी जि.प. अध्यक्षा उषाताई मेंढे यांची निवड करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी जिल्ह्यातील विविध प्रलंबित विकासकामांकडे जिल्हा नियोजन समितीचे लक्ष वेधून घेत, आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. यामध्ये अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या साखरीटोला येथील पोलीस स्टेशनच्या इमारतीचे बांधकाम तातडीने करण्यात यावे, तसेच त्यासाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत निधी उपलब्ध करून द्यावा, अशी प्रमुख मागणी उषाताई मेंढे यांनी केली आहे. साखरीटोला येथे सध्या केवळ पोलीस चौकी असून, नागरिकांकडून अनेक वर्षांपासून स्वतंत्र पोलीस स्टेशनची मागणी करण्यात येत आहे. या पोलीस चौकीच्या कार्यक्षेत्रात सुमारे १०५ गावांचा समावेश असल्याने नागरिकांना विविध तक्रारी व कामांसाठी सालेकसा पोलीस ठाण्यात जावे लागते. सालेकसा पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात आमगाव, देवरी व सालेकसा या तालुक्यांतील अनेक गावे येत असल्याने नागरिकांना मोठा प्रवास करावा लागतो. त्यामुळे नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन साखरीटोला येथे स्वतंत्र व सुसज्ज पोलीस स्टेशन उभारण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय आसोली ग्रामपंचायत, ता. आमगाव येथील पाटीलटोला महादेव पहाडी, आमगाव येथील साई मंदिर तसेच साखरीटोला येथील साखरीपाठ बाबा मंदिर यांना तीर्थक्षेत्र 'क' वर्गाचा दर्जा देण्याची मागणी करण्यात आली आहे. संबंधित मंदिरांसाठी वनविभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळवून तीर्थक्षेत्र 'क' वर्गासाठी मंजुरी प्रदान करावी, अशी मागणीही उषाताई मेंढे यांनी जिल्हा नियोजन समितीकडे केली आहे. तसेच साखरीटोला-डीवरटोला मार्गावर पूल बांधण्यात यावा, तसेच सावंगी-चिचटोला-धानोली मार्गावर पूल बांधण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. त्याचबरोबर येरमडा-जैतूरटोला-भवानीटोला-वडद-येरमडा-फुक्कीमेटा-आसोली या मार्गावरील विविध पुलांचे नियोजन करून आवश्यक ती मंजुरी व निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे. दरम्यान, आमगाव-गोंदिया मुख्य मार्गावर मोठ्या प्रमाणात जनावरे फिरताना आढळून येत असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे संबंधित जनावरांना सुरक्षितपणे जंगल परिसरात सोडण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. जिल्ह्यातील विविध भागांतील प्रलंबित विकासकामे मार्गी लागावीत, नागरिकांची गैरसोय दूर व्हावी आणि मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने उषाताई मेंढे यांनी जिल्हा नियोजन समितीसमोर या मागण्या मांडल्या आहेत. माजी जि.प. अध्यक्षा तसेच विद्यमान जि.प. सदस्य उषाताई मेंढे यांनी जिल्हा नियोजन समितीकडे विविध विकासकामांच्या मागण्या मांडल्याने आता या मागण्यांना कितपत यश मिळते आणि प्रत्यक्षात किती कामांना निधी व मंजुरी मिळते, याकडे सालेकसा व परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# ८ वर्षांची कायदेशीर लढाई जिंकुनही ८ महिन्यांपासून शेतकऱ्याला रस्ता मिळेना!

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी-किशोर साहू**

५ जुलै २०१८ पासून सुरू असलेली रस्त्याची कायदेशीर लढाई १५ ऑक्टोबर २०२५ ला जिंकल्यानंतर म्हणजेच तब्बल ८ वर्षानंतर रस्त्याची कायदेशीर लढाई जिंकल्यानंतर, आज शनिवार (ता. ८ ऑगस्ट) ला ८ महिन्याच्या कालावधी लोटूनही शेतकरी रस्त्यापासून वंचित आहे.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, ५ जुलै २०१८ रोजी शेतात येण्या जाण्याचा रस्ता अडविल्याची तक्रार अर्ज मौदा तहसील कार्यालयात येसंबा येथील वादी शेतकरी मारोतराव नामदेव गजभिये यांनी सादर करून त्यात नमूद केले की, वादी यांची शेती पहन ४९ अंतर्गत मौजा येसंबा येथे भू.क. १५ क्षेत्र २.५८ हेक्टर आर असून सदर शेतामध्ये येण्या - जाण्याच्या रस्ता प्रतिवादी धनी येथील रहिवासी व शेती येसंबा येथे असलेले नागेश्वर राममूर्ती विडीयाला यांनी अडविलेला आहे.

प्रतिवादी यांची शेती भू .क्र. १३ /१ व १४ असून प्रतिवादी यांच्या गट क्रमांक १५ या शेत जमिनीला पूर्वीपार वडिलोपार्जित शेत वहिवाटीच्या रस्ता भूमापन क्रमांक १३ मध्ये असलेल्या धूऱ्याजवळून गट क्र १४ व १५ चे मध्यभागातून संयुक्त धूऱ्याने पूर्व - पश्चिम आहे. वादी गजभिये यांच्या येण्या जाण्याच्या परंपरागत व वडिलोपार्जित रस्ता सन १९१२-१३ पासून पूर्वीपार असलेला वादी यांच्या बैलबंडी व ट्रॅक्टर येण्या जाण्याच्या शेती वहिवाटीच्या रस्ता प्रतिवादी विडीयाला यांनी ५ जुलै २०१८ ला अडविला.

प्रतिवादी यांनी गट क्रमांक १२, १३ व १४ मधून वादीच्या गट क्रमांक १५ मध्ये येण्या- जाण्याच्या मार्ग नाही असे म्हणून अस्तित्वात असलेला वडिलोपार्जित परंपरागत येण्या - जाण्याच्या रस्ता नांगरून उठीत केलेला आहे. सबब वादी यांचे बैलबंडी- ट्रॅक्टर येण्या - जाण्याच्या शेत वहिवाटीच्या मार्गास केलेला अडथळा दूर करून देण्याची विनंती वादी यांनी तहसील कार्यालय मौदा येथे केलेली होती.

याबाबत तहसील कार्यालय मौदा येथील नायब तहसीलदार टी एस नंदेश्वर यांनी चौकशी करून १३ जुलै २०२० ला वादी यांच्या बाजूने आदेश पारित केला. आदेशात त्यांनी नमूद केले की, अंदाजे १० ते १२ फूट रुंदीच्या वादी यांच्या वडिलोपार्जित, परंपरागत व पूर्वीपार अस्तित्वात असलेला शेत वहिवाटीच्या रस्ता प्रतिवादी यांचे पत्नीचे नावाने असलेली शेती भूमापन क्रमांक १३ मध्ये असलेल्या धुऱ्याचे जवळून भूमापन क्रमांक १४ व १५ लगत नांगरून उठीत केलेला रस्ता हा कायदेशीर प्रधिकाराखेरीज असल्याने तो त्वरित पूर्ववत प्रतिवादी यांनी आपल्या खर्चाने करावा तसेच सक्षम दिवाणी न्यायालयाच्या आदेशाखेरीज प्रतिवादी किंवा त्यांचे नातेवाईक कुटुंबातील व इतर यांनी वादी यांच्या वहिवाट शेत रस्त्याला कोणत्याही प्रकारच्या अडथळा भविष्यात करू नये यासाठी प्रतिवादी यांना याद्वारे मनाई आदेश देण्यात आला अन्यथा प्रतिवादी हे भारतीय दंड संहितेच्या कलम १८८ अंतर्गत कायदेशीर कारवाईस पात्र राहतील, असेही नमूद करण्यात आले.

या आदेशाच्या विरोधात प्रतिवादी विडीयाला यांनी निवासी उपजिल्हाधिकारी नागपूर रवींद्र खजांजी यांचे न्यायालयात अपील दाखल केले. ११ नोव्हेंबर २०२० रोजी उपजिल्हाधिकारी यांनी प्रतिवादी विडीयाला यांचे अपिल फेटाळात नायब तहसीलदार मौदा यांनी पारित केलेला १३ जुलै २०२० चा आदेश कायम ठेवला.

त्यानंतर प्रतिवादी वीडीयाला यांनी निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या आदेशाच्या विरोधात हायकोर्टात अपील दाखल केले व शेवटी १५ ऑक्टोंबर २०२५ ला हायकोटार्तून अपील मागे घेतले. तहसील कार्यालयातील १३ जानेवारी २०२६ पत्रानुसार, १३ जुलै २०२० ला पारित झालेल्या आदेशानुसार वादी गजभिये यांच्या रस्ता मोकळा करून देण्यासाठी चाचेर मंडळ अधिकारी श्रीमती काळे यांनी १० मार्च २०२६ व २२ मे २०२६ ला मोका चौकशी केली.

पंचनामा करताना वादी गजभिये, प्रतिवादी विडीयाला, उपसरपंच धनराज हारोडे, नायब तहसीलदार योगिता दराडे, मंडळ अधिकारी योगिता काळे, ग्राम महसूल अधिकारी गजानन पारधी, कोतवाल रोशन खेरगडे, वनरक्षक एन के मेश्राम सह लगतचे शेतकरी हंसराज घरजाळे, रंजीत घिवतोंडे, विठ्ठल महल्ले, रुपेश गजभिये उपस्थित होते. मात्र आज शनिवार आठ ऑगस्टला आठ वर्ष व आठ महिने लोटूनही कायदेशीर लढाई जिंकणाऱ्या वादी मारोतराव गजभिये हे रस्त्यापासून वंचित असून, अजूनही रस्ता मोकळा झालेला नाही हे विशेष!

## "एकच प्याला ": अजरामर शोकांतिकेचा मंगळवारी प्रयोग

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नाटककार राम गणेश गडकरी यांना नटराज चरणी विलीन होऊन शंभरच्या वर वर्षे होऊन गेली परंतु, त्यांच्या नाट्यलेखनाची मोहिनी आजही रसिकमनावर कायम आहे. गोविंदाग्रज या नावाने त्यांनी रचलेल्या कविता आजही रसिक काव्यप्रेमींना भुरळ घालतात. भावबंधन, प्रेमसंन्यास, राजसंन्यास, पुण्यप्रभावआणि एकच प्याला ही त्यांची नाटके म्हणजे मराठी संगीत रंगभूमीचे अलंकार आहेत. मराठी भाषेला ललामभूत असलेल्या भाषप्रभू राम गणेश गडकरी यांचे "संगीत एकाच प्याला" हे नाटक बघण्याचा योग नागपूरकरांना आला आहे. एका कर्तृत्ववान आणि गुणशाली पुरुषाची आणि त्याच्या संसाराची दारूच्या व्यसनाने कशी वाताहत होते याचे चित्रण या ,१९१७ साली लिहिलेल्या, नाटकात आहे. हा विषय आजही तितकाच लागू आहे. नटसम्राट बालगंधर्व यांनी यातील सिंधुची भूमिका अजरामर केली होती. गंधर्व काळातील ही शोकांतिका नव्या पिढीने अवश्य बघायला हवीआणि राम गणेश गडकरी यांच्या भाषेचा अनुभव घ्यायला हवा. नाटकाचा प्रयोग मंगळवार दिनांक ११ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६. ३० वाजता रेशीमबागेतील सुरेश भट सभागृहात होणार असून सध्या या नाटकाच्या तालमी राजेंद्र हायस्कुल येथे जोरात सुरु आहेत.



"संगीत मत्स्यगंधा"या नाटकाच्या अपूर्व यशानंतर ज्येष्ठ नाट्यदिग्दर्शक प्रभाकर ठेंगडी या नाटकाचे दिग्दर्शन करीत आहेत. नागपुरातील मध्यप्रदेश एज्युकेशन सोसायटीने या नाटकाची निर्मिती केली असून मोहन नाहातकर निर्माते आहेत. या नाटकात मनीष मोहरील (सुधाकर),यामिनी पायघन (सिंधू), मुकुंद वसुले (तळीराम), रोहिणी मोहरील (गीता),गुणवंत घटवाई (रामलाल ), विनोद तुंबडे(प्रभाकर) याशिवाय नारायण जोशी, विनोद काळे आदींच्या भूमिका आहेत. नाटकाचे नेपथ्य सतीश काळबांडे यांचे असून प्रकाश योजना किशोर बत्तासे यांची आहे. लालाजी श्रीवास रंगभूषा करतील तर ध्वनिसंयोजन बंडू पदम यांचे आहे. पार्श्वसंगीताची योजना अनिल इंदाने करतील. या नाटकातील पदांना अजय वेखंडे (व्हायोलिन), पिंपळे (ऑर्गन) आणि मोरेश्वर दहासहस्त्र (तबला) यांची संगती लाभणार आहे.

## दिवंगत ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मणराव जोशी, टी. बी. गोल्हर, विराग पाचपोर आणि मिलिंद ठेंगडी यांना श्रद्धांजली देण्यासाठी आज प्रेस क्लबमध्ये संयुक्त शोकसभा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मार्मिक आदरांजली "शब्द ज्यांचे शस्त्र होते, विचार ज्यांचे दीप होते... विदर्भाच्या आणि महाराष्ट्राच्या पत्रकारितेचा सुवर्णकाळ समृद्ध करणाऱ्या या चारही तपस्वी पत्रकारांनी आपल्या लेखणीने समाजाला नेहमीच जागृत ठेवले."

बातम्यांच्या गर्दीत सत्याचा शोध घेणारे एल. टी. जोशी, देशाच्या सीमेवरील प्रश्नांना वाचा फोडणारे विराग पाचपोर, वृत्तपत्राचा दर्जा जपणारे टी. बी. गोलहर आणि तत्त्वनिष्ठ विचारांची पेरणी करणारे मिलिंद ठेंगडी या चारही ज्ञानोपासकांच्या जाण्याने मराठी व इंग्रजी पत्रकारिता जगतात निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न येणारी आहे. या दिवंगत ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मणराव जोशी, टी. बी. गोल्हर, विराग पाचपोर आणि मिलिंद ठेंगडी यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता संयुक्त शोकसभा आयोजिण्यात आली आहे.

टिळक पत्रकार भवन ट्रस्ट, नागपूर श्रमिक पत्रकार संघ आणि पत्रकार क्लब ऑफ नागपूर यांच्या वतीने प्रेस क्लब सभागृहात होणाऱ्या या शोकसभेच्या अध्यक्षस्थानी राज्याचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे राहतील.

आमदार संजय भेंडे, डॉ. गिरीश गांधी, प्रकाश मेघे, सुधीर पाठक, विजय जावंधिया, किशोर तिवारी, डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, प्रफुल्ल गुडधे, प्रगती पाटील, प्रदीपकुमार मैत्र हे यावेळी शोकसंवेदना व्यक्त करतील.

# आम्ही मूल निवासी: मैत्री निसर्गाशी

कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे

कधीकाळी आदिवासी समाज म्हणजे जंगलात राहणारा वस्त्रशून्य किंवा अर्धवस्त्र समाज असली ओळख आता आदिवासी समाजनेही पुसून मुख्य प्रवाहाची वाट धरली आहे. या समाजातून शिक्षित आणि स्पर्धा परीक्षांमध्ये नैपूण्य दाखविणाऱ्यांचा टक्कादेखील वाढला आहे. वर्तमानातून उज्वल भविष्याकडे आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात जाताना आपल्या गौरवशाली परंपरांचे जतन करणारा आदिवासी समाज अशी एक नवी ओळख निर्माण झालेली आपणास इथे दिसते. आदिवासींना ढाल करुन काही शक्तींनी मधल्या काळात या विकासात खोडा घालण्याचा प्रयत्न केला. मात्र खऱ्या-खोट्याचा बोध झालेला आदिवासी आज नक्षलवाद्यांनाही विकासात आडवे येवू नका असे छातीठोकपणे सांगत आहे.

पोलीस दलाच्या सहाय्याने नक्षलवाद्यांचा उघड विरोध करुन इथं आता विकासवाटेवर वाटचाल सुरु झाली आहे, असेच या दिनाच्या शुभेच्छा देताना म्हणता येईल.

दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी विश्व आदिवासी दिवस साजरा केला जातो. पृथ्वीवर कधी काळी असणारे डायनासोरसारखे अजस्त्र जीव खगोलीय घटनांमुळे नामःशेष झाले. त्यानंतरच्या काळात आफ्रिका खंडातून मानव प्राण्याची उत्क्रांती झाली असे विज्ञान मानते. आफ्रिकेतून उत्क्रांत मानव प्राणी खंडाच्या प्रवासासोबत निरनिराळ्या खंडापर्यंत प्रवास करुन गेला आणि नंतरच्या काळात त्या खंडातील वातावरणाशी जुळवून घेत अधिक उत्क्रांत होत गेला. या सर्व प्रवासात शब्द, बोली आणि पुढे भाषा, संवाद अशी उत्क्रांती होत गेली असली, तरी जगाच्या निरनिराळ्या भागात आपल्या रुढी-परंपरा सांभाळून अनेक आदिम जमाती आजतागायत तग धरून आहेत. या जमाती किंवा मूळ निवासी यांची बोलीभाषा, रुढी परंपरा आजही कायम असल्याचे आपणास दिसते. जगात समाज व्यवस्था अस्तित्वात आली. त्यानंतर राष्ट्रांची निर्मिती, साम्राज्यवाद आणि त्यानंतर युद्ध असाही प्रवास झाला. १९व्या शतकात दोन महायुद्धे झाली. या महायुद्धांमध्ये प्रचंड असा विध्वंस झाला. त्यानंतरच्या काळात अस्तित्वात असणाऱ्या सर्व देशांनी एकमेकांचे स्वातंत्र्य, अधिकार, मैत्री, समन्वय यांना प्रथमच मान्यता दिली. त्याचा परिपाक म्हणून २४ ऑक्टोबर १९४५ या दिवशी संयुक्त राष्ट्रसंघ अस्तित्वात आला.

९ ऑगस्ट हा दिवस जागतिक आदिवासी दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवशी जगभरात आदिवासी बांधव एकत्र येऊन आपापल्या संस्कृती प्रमाणे वेशभूषा, गायन, नृत्य करून हा दिवस साजरा करतात. मानवाची जसजशी उत्क्रांती होत गेली तसतसा मानव पृथ्वीवर निरनिराळ्या खंडापर्यंत प्रवास करू लागला. तेथील वातावरणाशी त्याने जुळवून घेतले. हळूहळू शब्द, बोली आणि पुढे भाषा, संवाद अशी उत्क्रांती होत गेली. आजही जगाच्या कानाकोपऱ्यात अनेक आदिम जमाती आपली बोलीभाषा, रुढी परंपरा जपत निसर्गाच्या सानिध्यात राहत आहेत. आधुनिक दुनियेच्या झगमगटापासून आजही अनेक लोक कोसो दूर आहेत. अनेक वर्षांनंतर संयुक्त राष्ट्रसंघासमोर जी बाब समोर आली ती अतिशय धक्कादायक होती. ती बाब म्हणजे जगातील अनेक मूळ निवासी समुहांनी निसर्ग जपण्याचे मोलाचे कार्य केले. परंतु आधुनिक समाजाच्या मुख्य प्रवाहात येऊ न शकल्यामुळे या आदिम जमाती शिक्षण, आरोग्य, रोजगार व इतर अनेक सोयी, सुविधांपासून वंचीत राहिले आहेत. एका कवितेत वास्तव रेखाटले आहे ते योग्यच वाटते-

"जंगलाचा मी रहिवासी
नातं माझं निसर्गाशी,
झाडे, वेली, पशू-पक्षी सारे
आहेत माझे मित्र खरे,
मंजुळ पावरी वाजे
आम्ही आहोत जंगलाचे राजे
!!"

दि.९ ऑगस्ट १९९४पासून जगभरातील आदिवासी बांधवांना मूलभूत सुविधा व त्यांचे हक्क मिळावे, यासाठी जागतिक स्तरावर प्रयत्न सुरू झाले. भारतात मात्र संविधानानुसार १९५०पासूनच आदिवासी जमातींच्या विकासाची भूमिका समोर ठेवून तरतूद करण्यात आली होती. संविधानामधील



सर्वाधिक अनुच्छेद आदिवासी समाजाच्या हीत रक्षणासाठी आहेत. आदिवासी समाजाची एक स्वंतत्र जीवनशैली, रुढी, प्रथा, परंपरा आणि सामाजिक कायदे आहेत. अनेक ठिकाणी स्वशासनावर आधारित अशी समाजव्यवस्था अस्तित्वात होती. मात्र ब्रिटिश राजवटीत जमीन व जंगलावरील त्यांचा हक्क हिरावला गेला व त्यांच्या स्वयंपूर्ण समाजव्यवस्थेवर याचा प्रतिकूल परिणाम झाला. त्यामुळे त्यांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. आदिवासी समाजाला आपले हक्क व न्याय मिळवून देण्यासाठी पेसा कायदा अस्तित्वात आला आहे. पेसा कायद्याचे प्रमुख सूत्र आदिवासींची संस्कृती, प्रथा परंपरा याचे जतन, संवर्धन करणे व ग्रामसभेच्या माध्यमातून आदिवासी बांधवांची स्वशासन व्यवस्था बळकट करणे हे आहे.

संयुक्त राष्ट्रात लहान मोठे असे जगभरातील देश ज्यांची एकूण संख्या १९२ इतकी आहे, ते एकत्र आले. सीमांचे प्रश्न, आरोग्य समस्या, विश्व वारसा याबाबत सकारात्मक बदल संयुक्त राष्ट्र संघाच्या व्यासपीठातून जगासमोर आले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या कामकाजात तब्बल ५० वर्षे वाटचाल करताना जी बाब समोर आली, ती धक्कादायक अशी होती. जगातील विविध देशात साधारणपणे जंगलामध्ये वास्तव्य करणाऱ्या मूळ निवासी समुहांनी पर्यावरण जपण्याचे मोलाचे कार्य केले. परंतु समाजाच्या मुख्य प्रवाहात नसल्याने या आदिम जमाती शिक्षण, आरोग्य, रोजगार या सर्वांपासून कोसो दूर राहिल्या होत्या. या मूळ निवासी आदिम जमातींचे अस्तित्व मान्य करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने दि.९ ऑगस्ट १९९४ या दिवशी विश्व आदिवासी दिवस घोषित केला. त्यावेळेपासून दरवर्षी या दिवसाच्या निमित्ताने या जमातींच्या मुलभूत सुविधा पुरविण्याकडे लक्ष वेधणे व त्या मिळवून देणे याला सुरुवात झाली.

जागतिक स्तरावर या हालचाली खूप विलंबाने झाल्या असल्या, तरी भारतात मात्र देश स्वतंत्र झाल्यावर दि.२६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान अस्तित्वात आले. यात आदिवासी जमातींच्या विकासाची भूमिका ठेवून तरतूद करण्यात आली. संविधानामध्ये एकूण २२ भाग, १२ अनुसूची व ३९५ अनुच्छेद आहेत. यामधील सर्वाधिक अनुच्छेद आदिवासी समाजाच्या हीत रक्षणासाठी नमूद आहेत. आदिवासी समाजाची एक स्वंतत्र जीवनशैली आहे.

रुढी, प्रथा, परंपरा आणि सामाजिक कायदे यांच्या आधारे स्वशासन अशी त्यांची वैशिष्ट्यपूर्ण समाजव्यवस्था अस्तित्वात होती. इंग्रजाच्या काळामध्ये त्यांचा जमीन व जंगलावरील हक्क हिरावला गेल्याने त्यांच्या स्वयंपूर्ण समाजव्यवस्थेला तडा जावून त्यांचे जीवन परावलंबी झाले. त्यामुळे त्यांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. पेसा कायद्याने आदिवासी समाजाला त्यांचे अधिकार पुन्हा बहाल केले आहेत. पेसा कायद्याचे प्रमुख सूत्र आदिवासींची संस्कृती, प्रथा परंपरा याचे जतन, संवर्धन करणे व ग्रामसभेच्या माध्यमातून आदिवासींची स्वशासन व्यवस्था बळकट करणे आहे. पेसा कायदा महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यातील आदिवासीबहुल गावांना लागू होतो. पेसा कायद्यांतर्गत सामाजिक हित, रुढी परंपरा, प्रथा व सांस्कृतिक ओळख यांचे जतन व संवर्धन करण्यास, तसेच सामुहिक मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यास आणि आपआपसातील तंटे मिटविण्यास ग्रामसभा सक्षम आहे. यामध्ये आरक्षणाची तरतूद आहे.

लोकसंख्येच्या प्रमाणात परंतु निम्म्यापेक्षा कमी नाही इतके पंचायत राज संस्थामध्ये लोकप्रतिनिधी पदाचे आरक्षण, यामध्ये सरपंच पदाचे आरक्षणसुद्धा अंतर्भूत आहे. जमीन हस्तांतरणावर निर्बंध, भूमी संपादन व पुनर्वसन, कृषी, गौण वन उपज, लघु जलसाठे, गौण खनिजे, सावकारी परवाना, बाजार व्यवस्थापन, गावाचा विकास व आर्थिक व्यवस्थापन, अंमली पदार्थांचे नियमन, इत्यादी तरतूदी पेसा कायद्यात अंतर्भूत असून ग्रामसभेला पूर्ण अधिकार आहेत.

आदिवासींना समाजाच्या मुख्य प्रवाहात येणे शक्य व्हावे यासाठी आदिवासी बहूल जिल्ह्यामध्ये विविध सुविधा सुनिश्चित करण्यासाठी केंद्र आणि राज्य शासन स्तरावर स्वतंत्र असे आदिवासी विकास मंत्रालय स्थापन करून हमखास असा निधी या विकासकामांना दिला जातो. राज्यात गडचिरोली, नंदूरबार आणि पालघर हे जिल्हे मुख्यत्वे करून आदिवासी बहूल जिल्हे आहेत. या जिल्ह्यात भौगोलिक आव्हानांवर मात करीत या सर्व समाजाला आरोग्य, शिक्षण, परिवहन सुविधा आदींनी जोडून मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आदिवासी आश्रमशाळा तसेच वसतीगृहे उपलब्ध करून दिली जात आहेत. केवळ इतके करून होत नाही तर इतर मुलांच्या बरोबरीने त्यांना स्पर्धा करता यावी, यासाठी त्यांच्यासाठी नामांकित शाळांमध्ये शिक्षणदेखील आता नव्याने सुरू झाले आहे.

याठिकाणी आदीम जमातींचा अधिवास अतिशय दुर्गम भागात आहे. त्यामुळे आरोग्य सुविधा पुरविणे देखील एक मोठे आव्हान आहे. मात्र यात दळण-वळण साधने व इतर तंत्रज्ञानाची मदत घेतली जात आहे. गडचिरोली जिल्ह्यात मुख्यत्वे माडिया, गोंड तसेच परधान आदी आदीम जमाती आहेत. आदिवासींची मूळ भाषा आहे, यात माडिया व गोंडी या दोन मुख्य भाषा गडचिरोली जिल्ह्यात आहेत. या जमातीत मुख्य समाज भाषा रुजवताना त्यांची मूळ भाषा असणाऱ्या गोंडी-माडिया आदी भाषांचे संवर्धन कसे होईल. याबाबतही प्रयत्न जाणीवपूर्वक सुरू करण्यात आले आहेत. त्यांच्या रुढी, परंपरा यांची माहिती इतरांना मिळावी, यासाठी प्रयत्न होत आहेत.

कधीकाळी आदिवासी समाज म्हणजे जंगलात राहणारा वस्त्रशून्य किंवा अर्धवस्त्र समाज असली ओळख आता आदिवासी समाजनेही पुसून मुख्य प्रवाहाची वाट धरली आहे. या समाजातून शिक्षित आणि स्पर्धा परीक्षांमध्ये नैपूण्य दाखविणाऱ्यांचा टक्कादेखील वाढला आहे.

वर्तमानातून उज्वल भविष्याकडे आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात जाताना आपल्या गौरवशाली परंपरांचे जतन करणारा आदिवासी समाज अशी एक नवी ओळख निर्माण झालेली आपणास इथे दिसते. आदिवासींना ढाल करुन काही शक्तींनी मधल्या काळात या विकासात खोडा घालण्याचा प्रयत्न केला. मात्र खऱ्या-खोट्याचा बोध झालेला आदिवासी आज नक्षलवाद्यांनाही विकासात आडवे येवू नका असे छातीठोकपणे सांगत आहे. पोलीस दलाच्या सहाय्याने नक्षलवाद्यांचा उघड विरोध करुन इथं आता विकासवाटेवर वाटचाल सुरु झाली आहे, असेच या दिनाच्या शुभेच्छा देताना म्हणता येईल. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी! मूलनिवासी दिनाच्या समस्त मूलनिवासी बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी!

**- रामनगर वॉर्ड नं. २०, गडचिरोली**
**मो. ७७७५०४१०८६**

## देशाला मतदारसंघ पुनर्रचने ऐवजी भेसळयुक्त पदार्थांवर नियंत्रणाची गरज

रमेश लांजेवार
नागपूर

फक्त राजकारणासाठी व स्वतःच्या स्वार्थासाठी आरोग्याशी खेळ खेळू नये. सर्वप्रथम देशाच्या जनतेच्या भविष्याचा व आरोग्याचा विचार सरकारने करावा. नंतर राजकारणाचा विचार करावा. "आरोग्य हिच संपत्ती" असे म्हटल्या जाते परंतु यावरच सरकारकडून घणाघाती प्रहार होत आहे. कारण आज देशात सर्वच वस्तूमध्ये व पदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ होत असल्याचे दिसून येते आणि याचा सरळ परिणाम देशातील जनतेच्या आरोग्यावर होत आहे या संपूर्ण घटना सरकार उघड्या डोळ्यांनी पाहत आहे.देशात लोकसभा सदस्य,राज्यसभा सदस्य, विधानसभा सदस्य, विधानपरिषद सदस्य, जिल्हापरिषद सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, महानगरपालिका सदस्य, सरपंच इत्यादी अनेक लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी देशासह राज्यात, ग्रामीण भागात,शहरी भागात आहेत व यांच्या सोबतीला सरकारी यंत्रणा म्हणून मोठ्या प्रशासनाची साथ असतांना व राजकारण्यांचा एवढा मोठा फौजफाटा असतांना देशात मतदारसंघ पुनर्रचनेची गरजच काय? देशात लोकसंख्येच्या प्रमाणात शाळा नाही, विद्यार्थ्यांच्या प्रमाणात शिक्षक नाहीत, लोकसंख्येच्या प्रमाणात हॉस्पिटल नाहीत, लोकसंख्येच्या प्रमाणात नोकऱ्या नाहीत, लोकसंख्या प्रमाणात नागरी सुविधा नाहीत.परंतु राजकीय पुढाऱ्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात आमदार, खासदार,मंत्री पाहिजे ही कसली लोकशाही म्हणावी! याला तर हुकूमशाही म्हणावी लागेल. देशात अनेक ज्वलंत, गंभीर आणि जटील समस्या आहेत व ते प्रत्येक माणसाच्या आरोग्याशी निगडित आहेत. या संपूर्ण गोष्टी सरकारच्या डोळ्यासमोर असतांना सुध्दा सरकारला व राजकीय पुढाऱ्यांना फक्त आपले स्वार्थ साधण्यासाठी परिसीमन वाढविण्यावर जास्त भर देत असल्याचे दिसून येते. आज आरोग्याशी निगडित अनेक गंभीर समस्या देशाच्या १४५ कोटी जनतेपुढे आहेत.

आपण देशातील दुध उत्पादनाचा विचार केला तर दररोज देशात १४ कोटी लिटर दुधाचे संकलन होते. परंतु देशात दूधाचा खप दररोजचा ६४ कोटी लिटर होतो. म्हणजे देशात ५० कोटी लिटर दूध आले कोठून याची सरकारने कधीच चौकशी केली नाही आणि चौकशी करण्याला महत्त्व सुध्दा दिले नाही. परंतु मतदारसंघ पुनर्रचना करण्यासाठी व महिला आरक्षणासाठी सरकारकडून एडीचोटीचा जोर लावण्यात येत असून प्रयत्न सुरू आहे. आज ८० टक्के दुधाचा वापर मुलांच्या आहाराच्या रूपात वापरल्या जातो आणि प्रत्येक आईवडील आपल्या मुलांच्या आरोग्यासाठी दूधाचा वापर करतोच. देशात विकल्या जाणाऱ्या दुधाचा विचार केला तर ८० टक्के दूध बालकांच्या आहारात वापरल्या जाते व २० टक्के दूधाचा वापर सर्वसामान्यांनसाठी केला जातो. यावरून आपण समजू शकतो की, लहान मुलांचे आरोग्य किती धोकादायक श्रेणीमध्ये असावे. दुधातील भेसळ म्हणजे देशातील बालक, आबालवृद्ध व सर्वसामान्यांसाठी स्लोपॉयझनच म्हणावे लागेल. कारण दूधापासून शेकडो पदार्थ तयार होतात आणि एवढे दुध येतेच कोठून असा प्रश्न आज जनतेसमोर उपस्थित होत आहे. राजकीय पुढारी आपल्या स्वार्थासाठी मतदार संघ फेररचना करून राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या तयारीत आहे.सध्या देशात ५४३ लोकसभा सदस्य आहेत यात फेररचना करून ८५० करण्याच्या तयारीत सत्ताधारी पक्ष आहेत.सरकार महिलांना ५४३ संसद सदस्यामध्ये आरक्षण देण्यास तयार नाही. परंतु मतदार संघ वाढवून महिला आरक्षण देण्यावर जास्त भर देत आहे. याकरीता सरकार फोडाफोडीचे राजकारण करू बहुमताचा आकडा तयार करण्यासाठी संपूर्ण ताकदीनिशी सरकार प्रयत्न करीत आहे. विधेयक पारीत करण्यासाठी सध्याच्या ५४३ खासदारांच्या संख्याबळानुसार दोन तृतीयांश म्हणजे सरकारला लोकसभेत ३६० खासदारांची गरज आहे, सध्या राज्यसभेत २४५ खासदार आहेत बहुमतासाठी राज्यसभेत १६४ सांसद सदस्यांची गरज आहे. परंतु आज देशाला मतदारसंघ पुनर्रचना करण्याची काहीच गरज नाही. कारण देशात पुर्वीपासूनच लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधीं व सरकारचा प्रशासकीय मोठा जखीडा आहे.

- ९९२१६९०७७९

# केळी घेतांना मिळाला आयुष्याचा मोठा धडा...

डॉ.राजेंद्र विमल रामहरी टेकाडे

कालचा दिवस नेहमीसारखाच होता. काही कामानिमित्त काटोल तहसील कार्यालयाजवळ गेलो होतो. तेथून परतताना रस्त्याच्या कडेला असलेल्या एका फळ विक्रेत्याकडून केळी घ्यायचे ठरवले. केळीचा भाव विचारला, पैसे दिले आणि तो केळी मोजत असताना माझी नजर त्याच्या ठेल्यावर ठेवलेल्या एका पुस्तकावर गेली. पुस्तकाचे नाव होते "फकीरा."

क्षणभर मला आश्चर्य वाटले. फळांच्या घडांमध्ये हे पुस्तक कसे? सहजच मी त्या तरुणाला विचारले, "हे पुस्तक कोण वाचतं?"

तो हसत म्हणाला, "माझा लहान भाऊ."

मी पुन्हा विचारले, "तो काय शिकतो?"

त्याचे उत्तर ऐकून मन हेलावून गेले.

तो म्हणाला, "सर, त्याने सहावीनंतर शाळा सोडली. आता तो माझ्यासोबत फळ विकण्याचे काम करतो. पण त्याला पुस्तकं वाचायची खूप आवड आहे."

हे ऐकताच माज्या मनात अनेक विचारांचे वादळ उठले.




आजच्या काळात हातात मोबाईल असला की तासन्तास रील्स, व्हिडिओ आणि सोशल मीडियामध्ये आपण हरवून जातो. वाचनासाठी वेळ नाही, अशी तक्रार करतो. अनेक उच्चशिक्षित लोकही शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुस्तकांपासून दूर जातात. परीक्षा आणि नोकरीपुरतेच त्यांचे वाचन मर्यादित राहते. पण एका साध्या फळ विक्रेत्याच्या कुटुंबात, शिक्षण अर्धवट राहिलेल्या मुलाच्या हातात मात्र पुस्तक होते. हा विरोधाभास मनाला खूप काही शिकवून गेला.

केळी घेतल्यानंतर त्या मुलाने माझ्या पिशवीत आणखी तीन केळी टाकली. मी म्हणालो, "अरे, जास्तीची का देतोस?"

तो सहजपणे म्हणाला, "सर, तुम्ही माझ्याशी इतका छान संवाद साधला, म्हणून द्यावंसं वाटलं." त्याच्या त्या शब्दांमधील आपुलकी मनाला स्पर्शून गेली.

मी पुढे निघालो, इतक्यात त्याने पुन्हा हाक मारली.

"सर... तुम्हाला हे 'फकीरा' पुस्तक वाचायचं असेल तर घेऊन जा. वाचून झाल्यावर परत द्या." क्षणभर मी निःशब्द झालो.

माझी आणि त्याची कोणतीही ओळख नव्हती. तरीही त्याने आपल्या जपलेल्या पुस्तकावर माझ्यासाठी विश्वास ठेवला. पुस्तक देण्याची त्याची तयारी आणि एका अनोळखी माणसावर दाखवलेला विश्वास, हा माझ्यासाठी शिकण्याचा मोठा वस्तूपाठ होता.

"फकीरा" ही साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांची गाजलेली कादंबरी आहे. अन्यायाविरुद्ध लढणारा, स्वाभिमान जपणारा, संकटांवर मात करणारा आणि माणुसकीला सर्वोच्च मानणारा नायक या कादंबरीत उभा राहतो. संघर्षातूनही ज्ञान, स्वाभिमान आणि माणुसकीची ज्योत जिवंत ठेवण्याचा संदेश ही कादंबरी देते. कदाचित म्हणूनच त्या मुलाच्या हातात "फकीरा" पाहून मला त्या पुस्तकाचा आशय आणि त्या मुलाचे आयुष्य यांच्यातील अद्भुत नाते जाणवले.

काल मी केवळ केळी विकत घेतली नाहीत, तर आयुष्याचा एक अमूल्य धडा घेऊन परतलो.त्या साध्या मुलाने मला शिकवले की शिक्षणाची पदवी मोठी असण्यापेक्षा ज्ञानाची भूक मोठी असणे महत्त्वाचे आहे. आर्थिक परिस्थिती माणसाची स्वप्ने थांबवू शकत नाही. वाचनाची आवड असेल, तर प्रत्येक पुस्तक माणसाला अधिक समृद्ध, अधिक संवेदनशील आणि अधिक परिपक्व बनवत जाते.

खरंच, आयुष्यात मोठे धडे नेहमी मोठ्या माणसांकडूनच मिळतात असे नाही. अनेकदा साधी माणसे, साधे प्रसंग आणि साधे संवाद आपल्याला आयुष्यभरासाठी प्रेरणा देऊन जातात.आजही त्या फळ विक्रेत्याचा निरागस चेहरा, त्याने दाखविलेला विश्वास आणि "सर, पुस्तक घेऊन जा..." हे शब्द मनात कायमचे कोरले गेले आहेत.

वाचन ही केवळ सवय नाही, तर ती माणसाला घडवणारी संस्कृती आहे. आणि ही संस्कृती जिवंत ठेवणारा प्रत्येक हात, प्रत्येक पुस्तक आणि प्रत्येक वाचक समाजासाठी आशेचा किरण आहे.

ता.क.मुद्दाम त्या मुलाचा फोटो काढला नाही.

**- पंचवटी, काटोल**
**जि. नागपूर**
**संपर्क - ९१४५७७९०५०**